cmyk

## संपादकीय

### निवडणुका तोंडावर!

महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक तोंडावर आहे. निवडणूक आयोगाकडून त्या संबंधीची घोषणा कधीही केली जाऊ शकते. या संबंधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाष्य केल्याचे वृत्त आहे. आगामी नोव्हेंबर महिन्याच्या दुस-या आठवड्यात विधानसभेची निवडणूक होणे अपेक्षित आहे. याचाच अर्थ निवडणुकीला केवळ दोन महिने शिल्लक आहेत. राज्य विधानसभेची निवडणूक ऐन तोंडावर आलेली असतानाच राज्य सरकारने निधीची उधळण आणि नियुक्त्यांची खिरापत सुरू केली असून महायुतीमधील नेत्यांच्या वादग्रस्त विधानांना ऊत आला आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### मुंबई विद्यापीठाची सिनेट निवडणूक आज

मुंबई : मुंबई विद्यापीठाची सिनेट निवडणुक आज रविवारीच होणार आहे. याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. शनिवारी मुंबई विद्यापीठाची सिनेटची निवडणूक स्थगित करण्यात आली होती. याबद्दल राज्य शासनाकडून आदेश मिळल्यानंतर २२ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या निवडणुकीच्या स्थगितीचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र हे प्रकरण उच्च न्यायालयात गेल्यानंतर आता कोर्टाच्या निर्णयानंतर ही निवडणूक रविवारी म्हणजे २२ सप्टेंबर रोजी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. १० नोंदणीकृत जागांसाठी मतदान प्रक्रिया राबवली जाणार आहे. यासाठी शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या युवासेनेविरुद्ध अभाविप यांच्यासह मनसेने देखील कंबर कसली आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१५१ | रविवार दि.२२ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांना भरीव मदत करा !

## काँग्रेसच्या शिष्टमंडळाची राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**विदर्भ आणि मराठवाडा येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. परंतु मदत मिळाली नाही. यामुळे जनतेमध्ये, शेतकरी वर्गात प्रचंड प्रमाणात अस्वस्थता आहे. ही सर्व परिस्थिती राज्याचे प्रमुख म्हणून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या निदर्शनास आणण्यासाठी शनिवारी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने राजभवन येथे राज्यपालांची भेट घेतली. यावेळी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाकडून राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना निवेदन देण्यात आले.**



यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षाताई गायकवाड, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, खासदार चंद्रकांत हंडोरे, विशाल पाटील, आमदार अस्लम शेख, अमीन पटेल, नितीन राऊत, विश्वजित कदम, आरिफ नसीम खान, विक्रम सावंत, सचिन सावंत आदी उपस्थित होते. मराठवाड्यात अतिवृष्टी झाली, शेतकऱ्याचे सहा लाख हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले. अजूनही याचे पंचनामे झालेले नाहीत. केंद्रीय कृषी मंत्री यांनी आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्याचा दौरे करून मदत जाहीर केली पण महाराष्ट्रात मात्र अजूनही केंद्रीय कृषी मंत्री किंवा केंद्रीय पथक पाहणी करण्यास आले नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबाबत इतका दूजाभाव का ? या राज्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा दिसत नाही का त्यांना मदत करण्याची केंद्र आणि राज्य सरकारची भूमिका नाही. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी यात लक्ष घालणार

◀◀ पान २ वर

### परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारला निर्देश द्या

राज्यात महिलांवरील अत्याचारात मोठयाप्रमाणावर वाढ झाली असून अल्पवयीन, शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या बदलापूर व नागपूर येथे घडलेल्या गुन्ह्यात आरोपींना पाठीशी घालण्याचे काम सरकारकडून केले जात आहे. स्पर्धा परीक्षा रखडल्या आहेत. उमेदवारांना सरकारकडून नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत. युवा पिढी बेरोजगारीमुळे नैराश्याच्या गर्तेत जात आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी आपण सरकारला निर्देश द्यावेत, अशी राज्यातील जनतेची आपणाकडून अपेक्षा आहे, असे काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने राज्यपालांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### कायदा सुव्यवस्था ढासळली...

महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला. हा पुतळा कोसळणे म्हणजे महाराष्ट्राचा स्वाभिमान कोसळणे आहे. तरी अजून या सबंधित लोकांवर कारवाई झालेली नाही. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात हिंसक विधान करण्यात आली आणि ती देखील सत्ताधारी आमदार आणि खासदारांनी विधाने केली. आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्यास बक्षीस देण्याची तर खासदार अनिल बोंडे यांनी राहुल गांधी यांच्या जिभेला चटके देण्याची अश्लाघ्य विधाने केली. या विधानानी त्यांच्या जीवाला धोका असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणात मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांनी आणि पोलिसांनी खेदाने बघ्याची भूमिका घेतली. गुन्हा दाखल करण्यासाठी देखील काँग्रेस नेत्यांना आंदोलन करावी लागली त्यानंतर गुन्हे दाखल झाले, पण आमदार संजय गायकवाड आणि खासदार अनिल बोंडे यांना अजूनही अटक करण्यात आलेली नाही. या दोन्ही लोकप्रतिनिधींना तात्काळ अटक झाली पाहिजे, अशी मागणी शिष्टमंडळाने केली आहे.



### पितृपक्षाच्या कार्यक्रमाच्या अन्नातून २३ जणांना विषबाधा

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**केस तालुक्यातील उंदरी या गावातील एका पितृपक्षाच्या कार्यक्रमात २३ जणांना अन्नातून विषबाधा झाली या सर्वांवर ग्रामीण रुग्णालयांमध्ये उपचार करण्यात येत आहे विषबाधा झालेल्या सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती धारूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक शशांक वाघमारे यांनी दिली.**

याबाबत मिळालेली माहिती अशी की केज तालुक्यातील उंदरी येथे ठोंबरे परिवाराच्या पितृपक्षाचा कार्यक्रम होता या कार्यक्रमाच्या जीवनातून २३ जणांना विषबाधा झाली या सर्वांना तातडीने धारूरच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले या सर्वांवर वैद्यकीय अशी अधीक्षक डॉ.शशांक वाघमारे यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ.गोरख मोरे डॉ विजयकुमार सूळ डॉक्टर प्रवेश शेख डॉ. दत्तात्रय जाधव यांनी रुग्णांवर उपचार केले सर्व विषमतांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉ.शशांक वाघमारे यांनी दिली.

# मराठा-ओबीसी कार्यकर्ते आमने-सामने

## वडीगोद्री, अंतरावलीत घोषणाबाजी, पोलिसांच्या हस्तक्षेपाने तणाव निवळला



**जालना । प्रतिनिधी**

**राज्यातील मराठा समाजाच्या आरक्षणासाठी अंतरावली सराटी येथे आरक्षण समर्थक मनोज जरांगे पाटील यांचे पुन्हा एकदा उपोषणाचे आंदोलन सुरु झाले. मात्र अंतरावली सराटी येथे जाण्यासाठी वडीगोद्री येथूनच पुढे जावे लागते. नेमक्या वडीगोद्री येथे ओबीसी समाजाचे लक्ष्मण हाके आणि प्रा. नवनाथ वाघमारे यांचेही ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण नको या मागणीवरून आंदोलन सुरु आहे. शनिवारी दुपारी मराठा समाजाचे कार्यकर्ते आणि ओबीसी समाजाचे कार्यकर्त्ये अचानक समोरा-समोर आल्याने काही काळ येथील परिस्थिती तणावग्रस्त बनली. मात्र पोलिसांनी वेळीच दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना रोखल्यामुळे पुढील संभाव्य परिस्थिती टळली.**

शनिवारी राज्याच्या इतर भागातून मराठा आरक्षणासाठी उपोषणाचे आंदोलन सुरु केलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी बाईक रॅली काढत काही कार्यकर्त्ये अंतरवाली सराटी येथे

◀◀ पान २ वर

### फडणवीस, भुजबळ यांचे कारस्थान – जरांगे पाटील

यासंदर्भात मनोज जरांगे पाटील यांच्याशी संपर्क साधला असता म्हणाले की, मराठा समाजाच्या मागण्यांच्या विरोधात ओबीसी समाजाला उपोषणाला बसवून देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ हे दोन समाजात भांडण लावू पहात आहेत. निवडणूकीच्या तोंडावर ह्या असल्या गोष्टी करून दंगली घडविण्याचे कारस्थान असल्याचा आरोपही यावेळी केला.

### झुंडशाहीसमोर आम्ही झुकणार नाही – लक्ष्मण हाके

ओबीसी नेते गणेश हाके म्हणाले की, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची गरज नाही. प्रत्येक वेळी त्यांना फक्त देवेंद्र फडणवीस यांचा सागर बंगलाच का दिसतो, असे म्हणत त्यांना मुख्यमंत्री शिंदे आणि इतर मंत्र्यांचे बंगले दिसत नाहीत का? असा सवाल करत त्यांच्या झुंडशाहीसमोर आम्ही झुकणार नाही. त्यांनी काहीही मागणी करावी आणि सरकारने त्यांच्यासमोर होकार भरावा असे खपवून घेणार नसल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

### मराठा आंदोलकांना पर्यायी मार्ग देण्याचा प्रयत्न

मराठा आंदोलक अंतरवाली सराटीकडे जाण्याचा प्रयत्न करत आहेत. ओबीसी आंदोलकांनी रस्ता रोको केल्यामुळे पोलीस मराठा आंदोलकांना पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करत आहेत. कारण काही आंदोलक वडीगोद्री येथे जाण्याचा आग्रह करत आहेत. त्यामुळे घोषणाबाजी देत दोन्हीकडील आंदोलक आमने-सामने येत आहेत.

### वीज कर्मचारी दोन दिवस संपावर

सांगली: वीज क्षेत्रातील खासगीकरण आणि पेन्शनसह विविध मागण्यांसाठी महानिर्मिती, महापारेषण, महावितरण कंपन्यांमधील सर्वच कर्मचारी, अभियंते, अधिकारी आणि कंत्राटी वीज कामगार दि.२५ ते २६ सप्टेंबर २०२४ रोजी ४८ तासांच्या संपावर जाणार आहेत. हा संप १०० टक्के यशस्वी करण्याचा निर्णय तीन्ही कंपन्यांमधील कर्मचारी संघटनांनी घेतला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीतर्फे राज्य

◀◀ पान २ वर

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाई हिंगणगावात तीन केन्या पकडल्या

### १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त ;तिन जण अटक

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील हिंगणगाव परिसरात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती गूप्त बातमीदाराने स्थानिक गून्हे शाखेला दिली तसेच सदर ठिकाणी स्थानिक गून्हे शाखेने छापा मारला असता तिन केन्या ट्रॅक्टरसह ताब्यात घेण्यात आल्या आहेत तसेच या कार्यवाईत अंदाजे अंदाजे पंदरा

◀◀ पान २ वर



## मनोज जरांगेंच्या समर्थनार्थ बंदला प्रतिसाद

### व्यापारपेठा पुर्णत: बंद; बीड जिल्हा आंदोलनाचा केंद्रबिंदु

**बीड । प्रतिनिधी**

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी शनिवारी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. या बंदला जिल्हाभरात शंभर टक्के प्रतिसाद मिळाला असून दिवसभर व्यापारपेठा बंद होत्या.**

मनोज जरांगे हे आंतरवली सराटीमध्ये अमरण उपोषण करीत आहेत. त्यांची प्रकृती खालावल्याने मराठा समाज आक्रमक झाला आहे. जरांगे यांच्या समर्थनार्थ मराठा बांधवांनी शनिवारी बीड जिल्हा बंद पुकारण्यात आला होता. या बंदला

◀◀ पान २ वर





### जायकवाडीचा पाणीसाठा स्थिर; प्रकल्प जवळपास तुडुंब



**संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील सर्वांत मोठ्या जायकवाडी प्रकल्पातील पाणीसाठा गतकाही दिवसांपासून ९९.४५ टक्क्यांवर स्थिर करण्यात आला आहे. प्रकल्प जवळपास तुडुंबच असून, येत असलेल्या आवकेतून जवळपास निम्मा विसर्ग माजलगाव प्रकल्पासाठी उजव्या कालव्यातून सोडला जातो आहे.

जायकवाडी प्रकल्पाची पाणीसाठा क्षमता १०२.७३ टीएमसी इतकी आहे प्रकल्पात ७६.२४ टीएमसी जिवंत, तर १०२.३०

◀◀ पान २ वर

### शिवसेना, राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणाची २४ रोजी सुनावणी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

शिवसेनेसह राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी २४ सप्टेंबरला सर्वोच्च न्यायालयात होण्याची शक्यता आहे. मागील दोन आठवड्यांमध्ये पाच दिवस हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या पटलावर होते. मात्र, अन्य प्रकरणांमुळे आमदार अपात्रता प्रकरण सुनावणीपर्यंत पोहोचू शकले नव्हते. त्यामुळे यावेळी तरी या प्रकरणावर सुनावणी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२० सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ३.०० क्विंटल | २,४६० | २,७०० | २,६१३ |
| ज्वारी/हायब्रिड :१०१.५० क्विंटल | २,१५० | २,९८७ | २,४६४ |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : २४४.५० क्विंटल | ४,८६० | ७,४०० | ६,७११ |
| बाजरी : ७२.५० क्विंटल | २,१०० | २,८१० | २,४२४ |
| मुग : ७३.०० क्विंटल | ६,००० | १०,००० | ७,३२६ |
| सोयाबीन:२९४.०० क्विंटल | ३,७०० | ४,६२६ | ४,३८५ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ७,२०१ | ७,७०० | ७,४५० |


# बीड आगाराचे नियोजन संपूर्णपणे ढासळले

## भंगार गाड्या पुणे- मुंबईला आणि नवीन गाड्या खेड्यापाड्यात; पुणे – बीड गाडीला यायला लागले तब्बल साडेनऊ तास

**बीड । प्रतिनिधी**

बीड बस आगाराचे नियोजन संपूर्णपणे ढासळले असून लांब पल्ल्यासाठी भंगार गाड्या पाठवल्या जात असल्याने प्रवासाला दीडपट कधी दुप्पट वेळ लागतो. तर कधी गाड्या पोहोचतच नाहीत. अनेक वेळा पुण्याची गाडी बीडला येत नाही आणि बीडची गाडी पुण्याला जात नाही. अशी परिस्थिती आहे. शुक्रवारी रात्री पुण्यावरून बीड कडे निघालेली शिवशाही सायंकाळी ६ वाजता पुण्यातून निघाली मात्र ती पहाटे ३.३० वाजता बीडला पोहोचली. तब्बल साडेनऊ तास या गाडीला बीडला पोहोचायला लागले. या प्रकाराने प्रवासी आणि चालक- वाहकही वैतागले होते. यावेळी अनेकांनी मंडळाला शिव्यांची लाखोली वाहिली. वास्तविक पाहता लांब पल्ल्याच्या गाड्या नवीन असाव्यात जेणेकरून कुठलीही अडचण येणार नाही. मात्र बीड आगाराचे काम उलटेच आहे. खेड्यापाड्यात नवीन गाड्या जातात आणि भंगार गाड्या लांब पल्ल्याच्या

◀◀ पान २ वर









### यांत्रिकी विभाग काय करतोय?

वास्तविक पाहता एखादी बस आगारात आल्यानंतर ती पूर्णपणे तपासूनच बाहेर गेली पाहिजे. त्याची स्वच्छता झाली पाहिजे. स्वच्छता नाही झाली तरी निदान गाडी व्यवस्थित आहे का एवढे तरी पाहिले पाहिजे. मात्र हे काहीही पाहिले जात नाही आणि कसल्याही गाड्या रस्त्यावर चालतात. त्यामुळे प्रवाशांना नाहक अडचणीला सामोरे जावे लागत आहे. एखाद्या निर्मनुष्य ठिकाणी जर गाडी बंद पडली आणि महिला सोबत असल्या तर कुठलाही मोठा अनर्थ घडू शकतो. याची जरा अधिकाऱ्यांनी लाज बाळगली पाहिजे, असे बोलले जात आहे.

cmyk

## अग्रलेख

# 'परिवर्तन महाशक्ती' खरेच परिवर्तन करेल?

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारणामध्ये नवीन सक्षम आणि सुसंस्कृत पर्याय देण्यासाठी समविचारी नेत्यांनी पुण्यात एकत्र येत 'परिवर्तन महाशक्ती' ची घोषणा केली. छत्रपती संभाजीराजे, राजू शेट्टी, बच्चू कडू, शंकरअण्णा धोंडगे, वामनराव चटप, नारायण अंकुशे यांनी बैठकीनंतर पत्रकार परिषदेत 'परिवर्तन महाशक्ती' या तिसऱ्या आघाडीची घोषणा केली. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीला पर्याय देण्यासाठी तिसऱ्या आघाडीची स्थापना करण्यात आली आहे. आपण महायुतीतून बाहेर पडलो आहोत असे 'प्रहार'चे बच्चू कडू यांनी म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीतही बच्चू कडू यांनी अमरावतीमध्ये उमेदवारी देत बंडाळी केली होती.

'परिवर्तन महाशक्ती'चे चिन्ह अजून ठरलेले नाही. तिसऱ्या आघाडीमध्ये सामुदायिक नेतृत्व असेल, यासाठी समन्वय समिती नेमण्यात येईल, ही समिती सर्व निर्णय घेईल असे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे. २६ सप्टेंबरपर्यंत ज्यांना 'परिवर्तन महाशक्ती'मध्ये यायचे आहे त्यांनी यावे असे आवाहन त्यांनी केले आहे. राज्यातील विविध शेतकरी प्रश्नांसह होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इतर सर्व संघटना व छोट्या-मोठ्या पक्षांना सोबत घेऊन परिवर्तन आघाडी तयार करण्याचा निर्णय महिनाभरापूर्वी झाला होता. अखेर तिसऱ्या आघाडीचे परिवर्तन महाशक्तीमध्ये करण्यावर शिक्कामोर्तब झाले. या परिवर्तन महाशक्तीचा मेळावा २६ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. तिसऱ्या आघाडीत मनसेचाही सहभाग असावा याबाबत सकारात्मक विचार सुरू आहे. तसेच मराठा समाजासाठी काम करणाऱ्या शिवसंग्रामच्या प्रमुख ज्योती मेटे यांच्याबरोबरही चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. आता तिसरी आघाडी स्थापन झाल्यामुळे त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर आणि आगामी विधानसभा निवडणुकांवर काय आणि कसा परिणाम होईल हा सध्या चर्चेचा विषय बनला आहे. सामान्यपणे लोकसभा निवडणुकीत जे मुद्दे प्रचारामध्ये चालले तेच मुद्दे आता येणाऱ्या निवडणुकीत चालतील का हा मुख्य विषय आहे. लोकसभा निवडणुकीत चाललेले तीन मुद्दे म्हणजे, शेतकऱ्यांच्या समस्या, मराठा आरक्षणावरून सुरू असलेले आंदोलन आणि 'संविधान खतरे में है' हा विरोधकांनी केलेला प्रचार. या तीन मुद्यांभोवतीच राजकारण तापले आणि त्यानुसार निकाल आले. आगामी निवडणुकीत सुद्धा शेतकऱ्यांच्या समस्या आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा हे दोन मुद्दे पेटलेले राहतील. त्या अनुषंगाने सत्ताधारी महायुतीमध्ये थोडी हालचाल दिसत आहे. विविध प्रकारच्या आकर्षक योजना सादर केल्या जात आहेत. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना त्यापैकीच एक. तरीसुद्धा महायुतीच्या नेत्यांना दोन विषयांची चिंता आहे. एक म्हणजे राज्यात पुन्हा सुरू झालेले जरांगे-पाटील यांचे आंदोलन आणि दुसरे, सध्या राज्यात अनेक भागात दिसणारी शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती. यावर तोडगे कसे काढायचे याबाबत सत्ताधारी पक्षात खल सुरू आहे.

गत काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात नेत्यांची भरती प्रक्रिया वाढत चालली आहे. त्यामुळे जनतेमध्ये विरोधी पक्षाच्या बाजूने कल वाढलेला दिसू शकतो. त्यात आता तिसऱ्या आघाडीची भर पडली आहे. त्याचा फायदा कोणाला आणि कसा मिळेल याबाबत निरीक्षकांचे मत असे की, साधारणपणे तिसऱ्या आघाडीचा फायदा सत्ताधाऱ्यांना होऊ शकतो. कारण महाविकास आघाडीची मते ही सर्वसाधारणपणे सरकारच्या विरोधात असलेली मते आहेत आणि तिसऱ्या आघाडीच्या नेत्यांचा सूरसुद्धा सरकारच्या विरोधातच आहे. त्यामुळे तिसऱ्या आघाडीचा फटका काही प्रमाणात महाविकास आघाडीला बसेल. अर्थात तिसऱ्या आघाडीकडे उमेदवार आहेत का हेही बघावे लागेल. राज्याच्या विविध भागात उमेदवार उभे करावे लागतील. तिसरी आघाडी म्हणून जर हे नेते एकत्र लढणार असतील तर त्यांना राज्याच्या वेगवेगळ्या भागात स्वत:चे अस्तित्व दाखवावे लागेल. किमान शंभर मतदारसंघांमध्ये तरी उमेदवार उभे करावे लागतील. त्यांना आर्थिक बळ द्यावे लागेल, प्रचाराची साधनसामग्री द्यावी लागेल. हे सारे करण्यासाठी आता केवळ दीड महिन्याचा अवधी आहे. समजा तिसऱ्या आघाडीने उमेदवार दिले आणि त्यातील काही निवडून आले तरी निवडणूक झाल्यानंतर त्या उमेदवाराची भूमिका काय असेल ते सांगता येत नाही. असेही म्हटले जाते की, तिसऱ्या आघाडीचा फायदा नेहमीच मुख्य स्पर्धेत जे दोन पक्ष असतात त्यांच्यापैकी एकाला मिळतो. आघाडीला मिळत नाही. म्हणजे दिल्लीत गुजरात किंवा गोव्यात 'आप'ने उमेदवार उभे केले तर त्याचा फायदा भाजपलाच मिळणार. तसे महाराष्ट्रात तिसऱ्या आघाडीचा फायदा महायुतीला मिळण्याची शक्यता अधिक आहे.

महाराष्ट्राला सुसंस्कृत राजकारण हवे आहे, ते आम्ही देऊ इच्छितो असे तिसऱ्या आघाडीचे म्हणणे आहे. परंतु त्यासाठी त्यांनी लवकर सुरुवात करायला हवी होती. कारण जागावाटप, उमेदवारांचे चेहरे निश्चित होणे यासाठी आता खूपच थोडा अवधी शिल्लक आहे. मतदारांना प्रस्थापित चेहऱ्यांचा आणि त्यांनी बदललेल्या भूमिकांचा कंटाळा आला असेल तर एक नवा पर्याय म्हणून तिसऱ्या आघाडीकडे बघितले जाईल. विरोधकांची मते विभाजीत करण्यासाठी सत्ताधारी तिसऱ्या आघाडीचा वापर करतील काय ? याचे उत्तर काळच देईल.

# शेतकरी कामगार पक्षाचा तब्बल दीड तास रास्ता रोको

## जीवितास हानी निर्माण करणाऱ्या एनएसएल शुगर्सवर गुन्हे दाखल करा-ॲड.नारायण गोले पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

एन एस एल शुगर्स साखर कारखान्याने गतवर्षी गाळप केलेल्या उसाच्या मळीचे व विषारी पाणी माजलगाव धरणाच्या पाटात सोडून दिल्यामुळे, मळीचे व विषारी पाणी पवारवाडी, खरातआडगाव, निपाणी टाकळी, रोशनपुरी, मोठीवाडी, छोटीवाडी, गंगामसला आदी गावच्या विहिरीत, बोअरवेल मध्ये व गुरांच्या सार्वजनिक पाण्याच्या खड्ड्यामध्ये उतरले असून त्या पाण्यामुळे मनुष्यासह पशुधनाच्या जीवितास धोका निर्माण झाला असून खरात आडगाव येथे गाई, म्हशी, शेळ्या यांच्या गर्भधारणा होत नसुन खरात आडगाव येथे अनेक कुत्रे पिसाळली आहेत व त्यांनी अनेक नागरिकांना चावा देखील घेतला आहे, याशिवाय अनेक



शेतकऱ्यांची पिके या विषारी पाण्यामुळे जळून गेले असून अनेक नागरिक दवाखान्यांत हेलपाटे मारत आहेत, मनुष्यासह पशुच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या एन एस एल शुगर्स कारखान्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना २०२४-२०२५ च्या ऊस गाळपाचा परवाना देऊ नये, तसेच गेल्या दहा वर्षापासून शेतकऱ्यांना शेती परवडत नसल्यामुळे शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर झाल्यामुळे शेतकऱ्याचा संपूर्ण कर्ज माफ करण्यात यावी तसेच २०२०,२०२३,२०२४ चा पिक विमा शेतकऱ्याच्या खात्यात जमा करण्यात यावा तसेच गतवर्षीच्या सोयाबीन कापसाचे अनुदान सरसकट देण्यात यावे शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव देण्यात यावा,यासह मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या तात्काळ मंजूर करण्यात याव्यात या मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली गंगामसला येथे २१ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता तब्बल दीड तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी वाहनाच्या तब्बल तीन किलोमीटर रांगा लागल्या होत्या या वेळी तहसील प्रशासनाने आंदोलकाचे निवेदन स्वीकारले तर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता,या आंदोलनासाठी भाई राहुल सोळंके, भाई मुंजा पांचाळ, भाई अशोक कुलकर्णी, वल्लभ सोळंके, गणेश सोनटक्के, सुनील सोळंके, उत्तम भाऊ सोळंके, दिपक नाना सोळंके, बबलू कूकडे, डिगंबर सोळंके,रवि सोळंके, अभिजीत सोळंके, दत्ता सोळंके, अक्षय सोळंके, पी जी सोळंके, शरद सोळंके,शाम सोळंके,अमोल सोळंके,अरूण सोळंके, शीवाजी सोळंके, मनोहर चौधरी, विठ्ठल पंडीत कैलाश सोळंके,कैलाश सोळंके, मावली धरपडे भाई राजेभाऊ शेरकर, भाई लक्ष्मण चव्हाण, भाई भास्कर कांबळे, रोहीत वाघमारे,पमा शेरकर, मोहन शिंदे, मुकेश शेरकर, सदा पवार,शिद्दीक शेख,भारत आढाव, मुंजाराम रसावे ,कौस्तुभ जोशी, चांगदेव शेजूळ ,गोविंद आढाव , सतीश शेजूळ , राजेभाऊ मव्हाळे , अशोक आढाव, सुभाष थोरात विजय राठोड आदींनी परिश्रम घेतले.

## फुलांच्या पाकळ्यांची उधळण करत गणरायाला निरोप



**बीड प्रतिनिधी**

शिवरुद्र गणेश मंडळ विश्वनगर कॅनॉल रोड बीड या गणेश मंडळाने गुलाल विरहित फुलांच्या पाकळ्या उधळून गणेश विसर्जन थाटात केले. विशेष म्हणजे या मिरवणुकीमध्ये सर्व मुले व पुरुषांनी पांढरे कपडे परिधान केले होते, व महिला माता-भगिनींनी लाल साड्या परिधान करून पारंपारिक पद्धतीने टाळ मृदंग विना पकवाज व हरिनामाच्या गजरामध्ये तालासुरात पावल्या खेळत गणरायाला निरोप दिला. अगदी कुठलाही कर्ण कर्कश आवाज नाही, डीजे नाही, मिरवणुकीमध्ये कुठलेही इतर गाणे वाजले नाही आवाजाचा घोंगाटा नाही अगदी शांत पद्धतीने गणरायाला सर्व भक्तांनी आनंदी वातावरणामध्ये निरोप दिला .खरोखरच असे गणेश विसर्जन संपन्न व्हायला हवेत या शिवरुद्र गणेश मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मांडवा येथील शिवरत्न गणेश मित्र मंडळाच्या वतीने क्रीडा महोत्सव व महाप्रसाद,बस स्टॅन्डवर आसन व्यवस्थाची भेट

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील मांडवा येथील शिवरत्न गणेश मित्र मंडळ आयोजित भव्य क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता तसेच गणेशोत्सवानिमित्त ग्रामस्थांना बस स्टॅन्डवर आसन व्यवस्था व निवारा भेट दिली तसेच महाप्रसादाचा जंगी कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता.**



आष्टी तालुक्यातील मांडवा शिवरत्न गणेश मित्र मंडळाच्या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला विविध स्तूत्य उपक्रम राबवून गणेश उत्सव साजरा करण्यात आला. तालुक्यातील मांडवा येथील शिवरत्न गणेश मित्र मंडळ मांडवा या गणेश भक्तांनी सामाजिक बांधिलकी जोपासत वायफट खर्च न करता स्तुत्य उपक्रमाचे गणेशोत्सवानिमित्त आयोजन करण्यात आले होते.यामध्ये ग्रामस्थांना बस स्टॅन्ड सहित आसन व्यवस्थेची भेट दिली तसेच महाप्रसादाचा जंगी कार्यक्रम, भव्य कीर्तन सोहळा,शालेय क्रीडा स्पर्धा देखील आयोजित केला. प्रसंगी माजी सरपंच अशोक मुटकुळे, मेजर दादासाहेब मुटकुळे, उपसरपंच संतोष मुटकुळे,ग्रा.पं. सदस्य योगेश मुटकुळे, अनिल मुटकुळे,अध्यक्ष गणेश मुटकुळे, उपाध्यक्ष राघव मुटकुळे, सचिव प्रसाद नवले, सोमनाथ मुटकुळे, आकाश पवार, अभिषेक पवार, महेश पवार, निलेश पवार, संदीप पवार,अजय मुटकुळे संजय मुटकुळे, शरद मुटकुळे ,अमोल जाधव, अमोल मुटकुळे, मनोज मुटकुळे, महादेव नवले,सूरज पवार ,राम मुटकुळे, बापूराव धुमाळ, दिगंबर मुटकुळे, शुभम मुटकुळे, रोहन मुटकुळे, जयदत्त मुटकुळे, ऋषिकेश मुटकुळे अविनाश मुटकुळे प्रदीप मुटकुळे विशाल मुटकुळे भगवान श्रीखंडे संदीप मुटकुळे, अक्षय मुटकुळे, बिबीशन मुटकुळे, संजय मुटकुळे, कल्याण पवार, आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आकाशी झेप घे रे पाखरा...!

## आदिती अण्णासाहेब पोटफोडे उच्च शिक्षणासाठी परदेशात

**पुणे । प्रतिनिधी**

**अण्णासाहेब पोटफोडे बळेवाडी याची मुलगी आदिती पोटफोडे हिची अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उच्च शिक्षणासाठी नॉटीगम ट्रेड विद्यापीठ, युनायटेड किंग्डम येथे या उच्च शिक्षणासाठी निवड झाली आहे. नुकतीच ती हवाई जहाजाने रवाना झाली. या यशा बद्दल आदिती आणि तिचे वडील अण्णासाहेब यांचे बाळासाहेब भोस्टे मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.**

अण्णासाहेब पोटफोडे यांची परिस्थीत लहानपणासूनच हलाखीची होती मात्र ते वर्गात हूशार होते. अण्णसाहेबांच्या अनेक आठवणी त्यांचे वर्गमित्र बाळासाहेब भोस्टे यांनी या निमित्ताने सांगितल्या. अण्णांना मार्गदर्शन न मिळाल्याने त्यांना उच्च शिक्षण घेण्यात अडचणी आल्या शिवाय



त्यांना स्वतःचा ठसा उमटविता आला नाही. सद्या अण्णासाहेब साखर कारखान्यामध्ये नोकरीस आहेत. कारखान्यामध्ये नियमित पगार होत नसल्याने अनेक अडचणी असतात. परंतु अण्णांनी आपल्या दोन्हीही मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण दिले. मुलगा आकाश हा सध्या ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग झाला असून तो सध्या आकुर्डी पुणे येथे नोकरी करत आहे. मुलगी आदिती ही पहिल्यापासूनच हुशार होती. तिच्या हुशारीचमुळेच तीची विदेशात उच्च शिक्षणासाठी निवड झाली आहे. मुलीला परदेशात पाठविण्यासाठी वडील अण्णासाहेबांना शैक्षणिक कर्ज घ्यावे लागले आहे. आदितीची पुढील शिक्षणासाठी परदेशामध्ये निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आवेळी विमा प्रतिनिधी बाळासाहेब भोस्टे आणि अन्नाचा परिवार उपस्थित होता.

## पान १वरून...

### मराठवाडा, विदर्भाती

असल्याचे आश्वासन काँग्रेस शिष्टमंडळाला दिले आहे. त्याचबरोबर वादग्रस्त विधानबाबत गृह खात्याकडून माहिती घेऊन कडक कारवाई करण्याचे आश्वासनही राज्यपाल यांनी दिले.

----------

### मराठा-ओबीसी कार्यकर्ते

चालले होते. त्यावेळी या बाईक रॅलीवरून जाणाऱ्या कार्यकर्त्यांना पाहून ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलनास बसलेल्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी सुरु केली. त्यावरून मराठा कार्यकर्ते ओबीसी उपोषणास बसलेल्या ठिकाणाकडे घोषणा देत जाऊ लागले. ते पाहुन ओबीसी समाजाच्या कार्यकर्त्यांनीही मराठा समाजाच्या दिशेने पुढे जाण्यास सुरुवात केली. त्यामुळे येथील वातावरण तंग बनले. वडीगोद्रीजवळ बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांनी तातडीने या दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्याना सुरक्षित ठिकाणी थोपविण्याचे काम सुरु केले. त्यामुळे एकमेकांच्या समोर उभे ठाकलेल्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली.

----------

### मनोज जरांगेंच्या समर्थनार्थ

माजलगाव, परळी, बीड, धारुर, गेवराई, केज, वडवणी, आष्टी, पाटोदा आणि शिरुर तालुक्यात शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. सकल मराठा समाजाकडून छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करून मराठा समाज बांधव आंतरवाली सराटीकडे रवाना झाले. तसेच बीड जिल्हा मराठा आरक्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. त्याच अनुषंगाने जिल्हा बंदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा देखील चोख बंदोबस्त होता.

----------

### स्थानिक गून्हे शाखेची कार्यवाई

लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.तसेच या प्रकरणी तिन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.तसेच ही कार्यवाई ( दि २१ सप्टेंबर ) रोजी चार वाजण्याच्या सुमारास केली आहे. गेवराई पोलिस ठाणे हद्दीतून हा अवैध वाळू उपसा सुरू होता तसेच स्थानिक ठाणेदार तसेच महसूल ला याबाबद कल्पना कशी?नव्हती तसेच हिंगणगाव परिसरात गूप्त बातमीदार यांने स्थानिक गून्हे शाखा याला सदर ठिकाणी अनाधीकृत वाळू उपसा केल्या बाबद माहिती दिली तसेच स्थानिक गून्हे शाखेने हिंगणगाव परिसरातील गोदापात्रात छापा टाकला वाळू उपसा करण्यासाठी वापरण्यात येर्णाय़ा तिन केन्या ट्रॅक्टर सह जप्त करण्यात आला असून तिन जणांना अटक करण्यात आली आहे या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात गून्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू असून सदरची कार्यवाई बीड पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ,अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर ,पोनि उस्मान शेख ( स्था गू शा ) यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि मुरकूटे,ए एस आय जकताप,पोह ठोंबरे,पोह वाघमारे,चालक राठोड यांनी केली आहे.

----------

### शिवसेना, राष्ट्रवादी आमदार

राष्ट्रवादीसह शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात या दोन्ही आमदार अपात्रता प्रकरणांची सुनावणी एकाच वेळी घ्यायची, असे सर्वोच्च न्यायालयाने ठरवले होते. त्यानुसार गेले काही दिवस दोन्ही पक्षांच्या आमदार अपात्रता प्रकरणाच्या तारखा एकत्र पडत आहेत. मात्र यावर सुनावणी होऊ शकलेली नाही. दरम्यान, या प्रकरणाला आधी ऑक्टोबर महिन्यातील तारीख देण्यात आली होती. मात्र एका आठवड्यानंतर पुन्हा सप्टेंबर महिन्यामध्येच तारीख देण्यात आली होती. सप्टेंबर महिन्यात दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात पाच दिवस हे प्रकरण न्यायालयाच्या पटलावर होते. शिवसेना ठाकरे गटाला किंवा राष्ट्रवादी शरद पवार गटाला या प्रकरणावर लवकर सुनावणी हवी असल्यास असल्यास हे प्रकरण का महत्त्वाचे आहे याचे कारण देत न्यायालयासमोर हे प्रकरण नमूद करावे लागेल, मात्र त्यादृष्टीने शिवसेना ठाकरे गट किंवा राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून पावले उचलण्यात आले नाहीत. पुढच्या काही काळात महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होत आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल लागणार का, याबद्दल आता राजकीय वर्तुळात विविध तर्क वितर्क सुरू झाले आहेत.

**अजित पवारांना घड्याळाऐवजी नवे चिन्ह द्या -शरद पवारा गट**

न्यायालयात नमूद केलेल्या अर्जात सिंघवी म्हणाले की, महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका येत आहेत. आम्हाला तुतारी हे चिन्ह मिळाले असले तरी अजूनही लोकांना संभ्रम आहे. त्यामुळे अंतिम निर्णय येईल त्याला वेळही लागू शकतो. लोकांना संभ्रम राहु नये, म्हणून अजित पवारांना घड्याळाऐवजी नवे चिन्ह देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. यावर येत्या २५ तारखेला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. न्यायालय शरद पवार गटाचे म्हणणे ऐकून घेईल. मात्र त्यांच्या मागणीनुसार काही होऊ शकेल, अशी शक्यता कमीच आहे.

----------

### जायकवाडीचा पाणीसाठा स्थिर;

टीएमसी एकूण पाणीसाठा झाला आहे. प्रकल्पात शुक्रवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास ११३४ क्युसेकने पाण्याची आवक सुरू होती. तर जवळपास तुडुंब असलेल्या या प्रकल्पातून माजलगाव प्रकल्पाकरिता ६५० क्युसेकने सुरू असलेला पाण्याचा विसर्ग शुक्रवारी सकाळी सहाच्या सुमारासही कायम होता. प्रकल्पातील पाणीसाठा काही दिवसांपासून ९९.४५ टक्क्यांवर स्थिर आहे. गतवर्षी आजच्याच दिवशी प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी ३३ इतकी होती. यंदा जायकवाडी प्रकल्प तुडुंब झाल्याने रब्बी व उन्हाळी आवर्तनासह पिण्याच्या पाण्याची शाश्वती आली आहे. प्रकल्पावरून जवळपास २० शहरी व ग्रामीण पिण्याच्या पाणीपुरवठा योजना तसेच ७ औद्योगिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित आहेत. जायकवाडी प्रकल्पावर साधारणतः १ लाख ८३ हजार हेक्टरवर सिंचन होणे अपेक्षित आहे. या सिंचनासाठी रब्बीत तीन व उन्हाळी चार अशी एकूण सात आवर्तने यंदा हमखास मिळतील याची अपेक्षा आहे. साधारणतः प्रत्येकी २५ दिवसांची ही आवर्तने असतील. रब्बीचे आवर्तन डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत व उन्हाळी आवर्तन मार्च ते जून या कालावधीत सोडले जाईल. १५ ऑक्टोबरनंतर आवर्तनाच्या नियोजनाविषयी कालवा समिती बैठकीनंतर स्पष्टता होईल.

**आजवर आले ७९ टीएमसी पाणी**

जायकवाडी प्रकल्पात नगर, नाशिक भागांत झालेल्या जोरदार पावसामुळे गोदावरीच्या माध्यमातून १ जूनपासून आतापर्यंत जवळपास ७९.९९ टीएमसी पाणी आले. गतवर्षी प्रकल्प निम्माही भरला नाही, त्यामुळे आलेल्या या पाण्यापैकी ६७.६७९७ दलघमी म्हणजे २.३९ टीएमसी पाणीच आतापर्यंत सोडण्याची गरज पडली. आता पुन्हा एकदा पावसाचा अंदाज वर्तविला आहे. पाऊस आला आणि आवक वाढली तर पुन्हा एकदा प्रकल्पाच्या दरवाजातून गोदावरीच्या पात्रात विसर्ग करण्याचा निर्णय केला जाऊ शकतो अशी माहिती सूत्रांनी दिली.

----------

### बीड आगाराचे नियोजन

गाड्या म्हणून बाहेर पाठविल्या जातात. त्यामुळे प्रवाशांना अनेक वेळा मनस्ताप सहन करावा लागतो. ही परिस्थिती सुधारली नाही तर प्रवाशांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. बीड आगाराचा कारभार पूर्णपणे ढासळला असून लांब पल्ल्याच्या गाड्या अनेक वेळा अचानक बंद पडत आहेत. बीड- पुणे, बीड -मुंबई, बीड -सोलापूर, बीड -धुळे, बीड- यवतमाळ, बीड -नागपूर, बीड-अमरावती, बीड-अकोला अशा लांब पल्ल्याच्या गाड्या अनेक वेळा रात्री-अपरात्री बंद पडून प्रवाशांना मनस्ताप सहन करण्याची वेळ आलेली आहे. बीड- पुणे ही गाडी एकतर वेळेवर येतच नाही. आणि समजा आली तरी ती गाडी बीड पर्यंत येईल किंवा बीडहुन पुण्याला जाईल याची शाश्वती नाही, अशी परिस्थिती आहे. पुणे येथील आगार प्रमुखांना बीडची गाडी कधी येणार? असा प्रश्न विचारला तर ते सांगतात या गाडीचा काही नेम नाही. आली तर जाईल अद्याप आली नाही. शुक्रवारी ४, ५ आणि सहा वाजता पुण्यातून निघणाऱ्या तीनही गाड्या पुण्याला पोहोचल्याच नाहीत. शेवटी सहाच्या दरम्यान एक बीडची शिवशाही बस आली. या गाडीचे दिडपट तिकीट असतानाही दुसरा पर्याय नसल्याने प्रवाशांनी या गाडीतच प्रवास करणे पसंत केले. ही गाडी सहाच्या सुमारास पुण्यातून निघाली. मात्र गाडीला वेगच नसल्याने ही गाडी पुण्यातून बाहेर पडायलाच आठ-साडेआठ वाजले. मग नगरला कधी जाणार आणि बीडला कधी जाणार अशी या गाडीची अवस्था होती. या गाडीला सर्वच प्रवासी वैतागले होते. गाडी पळत नाही म्हणून वाहक आणि चालकही वैतागलेले दिसले. प्रवाशांना उत्तर देता देता चालकांच्या नाकीनऊ आले. मात्र ते हतबल होते. कारण गाडी वेगच घेत नाही म्हणून त्याला दुसरा पर्याय नव्हता. एकच गाडी आणि तीही अशा परिस्थितीत असल्याने प्रवासी महामंडळाला शिव्यांची लाखोली वाहत होते. मात्र दुसरी कुठलीही गाडी बीडला येणार नसल्याने आणि रात्री नगर पर्यंत जाण्यात काही अर्थ नसल्याने प्रवाशांना निमूटपणे याच गाडीत प्रवास करणे गरजेचे होते. वास्तविक पाहता लांब पल्ल्याच्या गाड्या नवीन असाव्यात किंवा कंडिशन मध्ये असाव्यात जेणेकरून कुठलीही अडचण प्रवासात येणार नाही. मात्र तसे होत नाही. कुठलीही भंगार गाडी उचलायची आणि पुणे, मुंबईला पाठवायची अशी या आगाराची परिस्थिती आहे. ही परिस्थिती सुधारली नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा प्रवाशांनी दिला असून, वेळेत नियोजनात सुधारणा व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. याबरोबरच खासगी गाड्यांच्या सोयीसाठी तर लांब पल्ल्याच्या भंगार गाड्या आगारातून पाठवत नाहीत ना ? अशी शंकाही काही प्रवाशांनी यावेळी उपस्थित केली.

----------

### वीज कर्मचारी

शासनाला संपाची नोटीस दिली आहे. या निवेदनात म्हटले की, वीज वितरणाचा परवाना व वीज कंपन्यांच्या खासगीकरण बाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती. त्यावेळी फडणवीस यांनी वीज कंपन्यांचे खासगीकरण करणार नाही, असे आश्वासन दिले होते. त्यानंतरही वीज कंपन्यांमध्ये खासगीकरण सुरुच आहे. १६ जलविद्युत निर्मिती केंद्रे सर्वात कमी खर्चात वीज निर्मिती करत आहेत. त्या संचाचे आधुनिकिकरण व नूतनीकरणाच्या नावाखाली खासगी भांडवलदारांच्या ताब्यात देण्याचा कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. महापारेषण कंपनीच्या व्यवस्थापनाने २०० कोटी वरील प्रकल्प खासगी उद्योजकांना उभारणी, चालवणे व देखभाल-दुरूस्तीसाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. या खासगीकरणाला कर्मचारी, अभियंते, अधिकाऱ्यांचा तीव्र विरोध आहे. केंद्र आणि राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन वीज कंपन्यांमधील कर्मचारी, अभियंते, अधिकाऱ्यांनाही सुधारित पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी आहे. वीज कंपन्यांमधील रिक्त जागा त्वरित भरावेत, अशीही मागणी आहे. या मागण्यांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी २५ व २६ सप्टेंबरला वीज कर्मचारी संपावर जाणार आहेत.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि.२२ सप्टेंबर २०२४



## विजय जाहेर यांची महाराष्ट्र महिला खो-खो संघाचे प्रशिक्षकपदी नियुक्ती



गेवराई :- गेवराई येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल शाळेतील क्रीडाशिक्षक तथा बीड जिल्हा खो -खो संघटनेचे सचिव, राष्ट्रीय खो -खो खेळाडू विजय जाहेर यांची खेलो इंडिया महिला खो-खो लीगसाठी महाराष्ट्रच्या मुलींच्या संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. वडोदरा, गुजरात येथे २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय खेलो इंडिया महिला लिगसाठी महाराष्ट्राच्या मुलींचा संघ घोषित करण्यात आला आहे . या संघाच्या प्रशिक्षक पदी विजय भागवत जाहेर यांची नियुक्ती करण्यात आली आहे . या नियुक्तीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे . विजय जाहेर यांचे महाराष्ट्र खो- खो असोसिएशनचे आश्रयदाता तथा राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार, खो-खो संघटनेचे अध्यक्ष संजीव नाईक निंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार अॅड . गोविंद शर्मा ,सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांच्यासह महाराष्ट्राचे कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष माजी आमदार अमरसिंह पंडित, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर पंडित, महाराष्ट्र खो- खो संघटनेचे ज्येष्ठ संघटक शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. शेळके जे पी , जेष्ठ क्रीडा मार्गदर्शक प्रा . राजेंद्र बरकसे,बीड जिल्हा खो - खो संघटनेचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, रमेशभाऊ शिंदे, तसेच न्यू हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक अंकुशराव तौर, शालेय समितीचे सर्व सदस्य, पंच, प्रशिक्षक व क्रीडाशिक्षक आदींनी विजय भागवत जाहेर यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत .

# मयुरी देवेंद्र राऊत यांच्या मृत्यूची चौकशी करुन दोषींवर कारवाई करा

### महाराष्ट्र राज्य महिला व बालविकास अधिकारी संघटनेची निवेदनाद्वारे मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

दिवंगत मयुरी देवेंद्र राऊत (कर्पे), अधीक्षक (गट ब), महिला वस्तीगृह, जळगांव, तसेच त्यांचे पती देवेंद्र राऊत, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव, यांना कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी झालेल्या मानसिक छळाबाबतच्या त्यांच्या कुटुंबियांच्या तक्रारीची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य महिला व बालविकास विभाग राजपत्रित अधिकारी संघटनेकडून मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले आहे.




दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, महिला व बाल विकास विभाग गट ब (राजपत्रित) पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती. मयुरी देवेंद्र राऊत (कर्पे), वय वर्ष ३२, यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले असून त्यांचे पती देवेंद्र राऊत, हे जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जळगांव जिल्हा परिषद, जळगांव, गट अ (राजपत्रित) या पदावर कार्यरत आहेत. देवेंद्र राऊत यांना कामकाजाच्या ठिकाणी होणाऱ्या मानसिक त्रासामुळे मानसोपचार घ्यावे लागले व त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम हा त्यांच्या कुटुंबीयांवर झाल्याने त्यांच्या पत्नीचे निधन झाले आहे. वस्तुतः घडलेली घटना ही अत्यंत दुर्दैवी असून याबाबत उच्चस्तरीय चौकशीची आग्रही मागणी तीव्रतेने करण्यात येत आहे. याची दखल घेऊन वरील मागण्यांबाबत तात्काळ उचित कार्यवाही व्हावी. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष संतोष भोसले, उपाध्यक्ष कालीदास बडे, सचिव डॉ.श्री. कैलास घोडके, सहसचिव रामेश्वर मुंडे, कोषाध्यक्ष सुहिता ओव्हाळ, कार्यकारिणी सदस्य दिपक बानाईत, किर्तीकुमार कटरे, राजश्री कोलखेडे, ओमप्रकाश नगराळे, गणेश वाघ, ज्योती बेल्हेकर, निशीगंधा भवाळ, शरद कुऱ्हाडे, प्रशांत शिर्के, आसमा आतार या पदाधिकारी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# तिर्थपुरीत रास्ता रोको

**जालना । प्रतिनिधी**

तीर्थपुरी येथे दि २१ सप्टेंबर रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने येथील छत्रपती चौकात काही काळ रास्ता रोख करण्यात आला

मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे १६ सप्टेंबर पासून आंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी उपोषणास बसले आहेत.पाटलाच्या उपोषणाचा आजचा पाचवा दिवस आहे दिवसेंदिवस त्यांची प्रकृती अतिशय चिंताजनक होत चालली असून शासन स्तरावर पाटलाच्या उपोषणाची कुठलीही दखल घेतली गेलेली दिसून येत नसल्या कारणाने महाराष्ट्रातील सकल मराठा समाज हा आपल्या आपल्या पद्धतीने रस्त्यावर



उतरत आहे त्या अनुषंगाने आज तीर्थपुरी येथील रस्ता रोको करण्यात आला या सरकारने प्रशासनाने दोन दिवसात सोमवार पर्यंत पाटलांच्या व मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याविषयी व सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी व आणखी मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासंदर्भात ज्या मागण्या असतील त्या मागण्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करावा नसता घनसावंगीसह महाराष्ट्रातील सकल मराठा समाज हा येत्या सोमवार नंतर मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलने रास्ता रोको इत्यादी ज्ञात असणारे आंदोलने तीव्र स्वरूपात करेल याची सरकारने नोंद घ्यावी व उद्भवणाऱ्या परिस्थितीस सर्वस्वी पद्धतीने यास संबंधित प्रशासन जबाबदार राहील असे निवेदन तीर्थपुरी येथील सहाय्यक पो.नि साजिद अहमद यांना लेखी निवेदन देण्यात आले.



## इमापुर येथे बैलगाडा शर्यत

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे इमामपुर येथे गावकऱ्यांच्या वतीने बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी बैलगाडा शर्यतीचा शुभारंभ करून सर्व गावकऱ्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी परीसरातून बैलगाडा शर्यत प्रेमी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की आजही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांने बैलगाडी शर्यत हा परंपरागत खेळ जोपासला आहे,या बैलगाडा शर्यतीच्या माध्यमातून शेतकरी मोठ्या प्रमाणात हा छंद जोपासतात याचे समाधान वाटते असे मत याप्रसंगी व्यक्त केले.. यावेळी उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, माजी सरपंच वैजनाथ नेवाळे, मुकादम नवनाथ साळुंके, विनोद गूंड पाटील, अजय गायकवाड, निलेश पवार, चंद्रसेन चव्हाण,बाळू चव्हाण सह परिसरातील बैलगाडा शर्यत प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ईद निमित्त राबविले विविध उपक्रम ; २ क्विंटल लाडू वाटप

जालना । प्रतिनिधी

मुस्लीम धर्मियांच्या ईद ए मिलादुन्नबी या सणा निमित्त जालना शहरातील अलंकार चौक परिसरत ईद-ए-मिलाद निमित्त देशसेवा फाउंडेशनने लाडुचे वाटप, आणि पोलिस प्रशासनातील कर्मचार्यांचा सत्कार तसेच जुलूस मध्ये सहभागी झालेल्यांचा गौरव यासह अन्य उपक्रम देशसेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख जावेद यांनी राबविल्याने त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

देशभरा मध्ये ईद मिलाद उन नबी हा मुस्लीम धर्मीयांचा सण साजरा करण्यात



आला. या सणा साठी शासनाने सुट्टी देखील जाहीर केली होती. परंतू जालन्यामध्ये गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर तीन दिवस ऊशिराने म्हणजे गुरूवारी ईद मिलाद उन नबी हा सण साजरा केला.शहरात शांतता,जातीय सलोखा आणि कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यामुळे मुस्लीम धर्मीयांनी आज गुरूवारी ईद मिलाद उन नबी हा सण साजरा केला.सामाजिक कार्यकर्ते शेख जावेद देशसेवा फाउंडेशन यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून ईद निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहरातील अलंकार चौक परिसरात शेख जावेद यांच्या दोन क्विंटल चे लाडु वाटप करण्यात आले. देशसेवा फाउंडेशनच्या वतीने संपूर्ण अलंकार चौक परिसर शुभेच्छा फलकाने तसेच विद्यूत रोषणाईने झळाळून निघाला.ईद ए मिलाद उन नबी निमित्त शहरातील येथे समारोप झाला. दरम्यान अलंकार चौकात देश सेवा फाउंडेशन यांच्या वतीने जुलूस मध्ये सहभागी झालेल्यांचा सत्कार करण्यात आला. जुलूस मध्ये तरूणांसह नागरीकांची मोठ्या संख्येने ऊपस्थिती होती. कार्यक्रमास ऊपस्थित राहून मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माध्यमांशी बोलतान म्हणाले की, गणपती विसर्जन आणि ईद ए मिलादुन्नबी हे दोन्ही सण एकाच दिवशी येत असल्याने मुस्लिम समाजाने अत्यंत सामंजस्याची भूमिका घेत आपला सण तीन दिवसा नंतर साजरा करण्याचा जो निर्णय घेतला तो अत्यंत कौतुकास्पद असून यामुळे दोन्ही समाजामध्ये भाईचारा, शांतता प्रस्थापित होण्यास नक्कीच मदत होईल असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देशसेवा वेलफेयर फाउंडेशनचं संस्थापक अध्यक्ष शेख जावेद भाई, इरफान पठान, शेख रफीक, इरफान शेख, सईद शेख, अब्दुल नईम, तबरेज अली, फहीम भाई, हारून शाह, अशफाक तंबोली , शेख रहीम, सोनू भाई ,आमेर भाई, शेख शाहरुख ,, अजीम खान, आरेफ सैयद, अकबर शेख, सिकंदर सैयद,मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

## डिजिटल मीडिया परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी अनिल वाघमारे यांची निवड

**पुणे । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून डोंगरचा राजा चे संपादक अनिल वाघमारे यांची नुकतीच निवड जाहीर करण्यात आली. संपादक अनिल वाघमारे यांच्या निवडीबद्दल सर्वच क्षेत्रातील मान्यवर, स्नेही मित्रांनी अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



याबाबत अधिक वृत्त असे की, पुण्यातील पिंपरी चिंचवड येथे आचार्य अत्रे सभागृहात नुकतीच मराठी पत्रकार परिषद संलग्न असलेल्या डिजिटल मिडिया परिषदेची राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या कार्यक्रमात गेल्या अनेक वर्षांपासून मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री. एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात परिषदेचे काम करत असलेले तसेच श्री.एस.एम.देशमुख यांचे अत्यंत विश्वासू म्हणून ओळखले जाणारे संपादक अनिल वाघमारे यांची डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. व्यासपीठावर उपस्थित असलेले परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी त्यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड केली जात असल्याचे जाहीर करताच सभागृहात टाळ्यांचा गजर करत उपस्थित हजारो पत्रकार बांधवांनी त्यांचे अभिनंदन केले. संपादक अनिल वाघमारे हे गेली अनेक वर्षे मराठी पत्रकार परिषदेच्या जडणघडणीत मोलाचं काम करत आले आहेत. बीड जिल्ह्यातल्या वडवणी या छोट्याशा तालुक्यात त्यांनी आपल्या पत्रकारीतेचा प्रारंभ केला. व सर्व सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या लेखणीतून सतत पाठपुरावा केला. बीड जिल्ह्यातील सर्व राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांमध्ये त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. त्यांची एकनिष्ठता,संघटन कौशल्य आणि अनुभव या सर्वांचा विचार करून मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी त्यांची निवड जाहीर केली आहे. संपादक अनिल वाघमारे यांच्या निवडी बद्दल महाराष्ट्र राज्यातील पत्रकार,स्नेही मित्र व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

## युसूफवडगांव येथे वीज पडुन गाय मृत्युमुखी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे आज दुपारी ४ वाजेच्या सुमारास वादळी वारा व विजेच्या गडगडाटासह जोरदार पाऊसचे आगमन झाले.यावेळी वीज पडुन एक मृत पावली तर पावसाच्या अगोदर सुटलेल्या वादळी वाऱ्याने मात्र शेतकऱ्यांचे नुकसान अतोनात नुकसान झाले.



अचानक आलेल्या पावसामुळे कुठे काढुन ठेवलेले सोयाबीन भिजले तर कुठे सोयाबीनच्या काढुन रचलेल्या गंजीवरील ताडपत्री उडुन गेल्याने कुणाच्या गंजी उठल्या तर कुठे ताडपत्री उडाल्याने सोयाबीनच्या गंजीच्या गंजी भिजुन शेतकऱ्यांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे.तर युसूफवडगांव येथील शेतकरी अशोक तोडकर यांच्या गोठ्या बाहेर बाभळीच्या झाडा खाली बांधलेल्या गाय वीज पडुन ती जागीच मृत पावल्याची घटना घडली आहे.

# शिवकालीन श्री गणेश मंदिर शिखर कामाचा शुभारंभ

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील गहुखेल, म्हसोबाचीवाडी,उंदरखेल हे नगर- बीड रोड आवारात गणेश माळावर हे शिवकालीन गणेशाचे पुरातन मंदिर आहे या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे

जागृक देवस्थान असून नवसाचा गणती म्हणून हा गणपती पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे असे या गणपतीचे नाव आहे. काम करत असताना अनेक अडचणी समोर येतात पण श्री गणेशाच्या कृपेने आशिर्वादाने सर्व अडचणी दूर होऊन कामे होतात या श्री गणेश मंदिराचे शिखर बांधकाम बाकी असुन आज या कामाचा गुरुवर्यांच्या हास्ते पुजन करून नारळ फोडून सुरुवात केली आहे, या



शिवकालीन श्री गणेश मंदिराचे शिखर कामाचा दि१७ मंगळवारी रोजी शुभारंभ करण्यात आला या शुभप्रसंगी उपस्थित प्रमुख अतिथी

म्हणून ह.भ.प. जगन्नाथ महाराच शास्त्री जगदंबा गड कारेगाव ,ही.भ.प. प्रभूदेव शेकडे महाराज ,ह.भ.प. विष्णू महाराज आंधळे राम गड संस्थान लिंबोडी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित युवा नेते सागर भैय्या धस,युवा उद्योजक सागर दादा शेकडे पंचक्रोशीतील सर्व मान्यवर व भाविक भक्त गण सोबत आमच्या दैनिकचे प्रतिनिधी प्रेम पवळ हे उपस्थित होते.

# ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था,टाकळीभान आयोजित आज राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

### आष्टीचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय वाघ,डॉ.सुनिल गदादे, पत्रकार अक्षय विधाते,कविता आनंदकर, होणार राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

श्रीराम तालुक्यातील टाकळीभान येथील ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आज रविवार दि. २२ सप्टेंबर रोजी दुपारी बारा वाजता रुक्मिणी माधव मंगल कार्यालय टाकळीभान येथे तालुक्यातील पुरुष महिला सफाई कामगार यांना साहित्याचे वाटप व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत यांनी दिली असून या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा चे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले असून आष्टी तालुक्यातील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भगवान महाविद्यालय आष्टी,आदर्श महाविद्यालय म्हणून राज्यस्तरीय पुरस्कार प्राचार्य वाघ डी.डी.यांना जाहिर झाला आहे.तर उत्कृष्ट शासकीय सेवा म्हणून डॉक्टर सुनील गदादे, आदर्श पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श पत्रकारिता राज्यस्तरीय पुरस्कार पत्रकार अक्षय विधाते,आदर्श शिक्षिका म्हणून सौ.कविता गोकुळ आनंदकर,यांना आज पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अर्जुन राऊत यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे,श्रीरामपूर तालुक्याचे आमदार लहू कानडे,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य सागर वैद्य उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी ऍडवोकेट प्रभाकर तावरे उपस्थित राहणार आहेत तसेच कार्यक्रम प्रसंगी दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे संपादक करण नवले,माजी सभापती डॉक्टर वंदनाताई मुरकुटे,जल अभ्यासक भिला सोनू पाटील, शिक्षणाधिकारी अशोकराव कडूस,मा.सभापती




नानासाहेब पवार,विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून याप्रसंगी सफाई कामगार यांना साहित्याचे वाटप करण्यात येणार असून मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती संस्था यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे या सोहळ्यामध्ये आष्टी तालुक्यातील येथील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या चार मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.यामध्ये उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून शेतकरी शिक्षण महाविद्यालय प्रसारक मंडळ संचलित भगवान महाविद्यालय या महाविद्यालयाने आतापर्यंत अनेक विद्यार्थी उत्कृष्ट प्रकारे घडवले असून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करत आहेत त्या महाविद्यालयाच्या कार्याची दखल घेऊन प्राचार्य वाघ डी.डी.यांना आदर्श महाविद्यालय म्हणून सन्मानित करण्यात येणार असून पशु सेवेमध्ये कार्यरत असलेले पशु सेवा हीच ईश्वर सेवा मानून प्रामाणिकपणे काम करून आपल्या उल्लेखनीय कार्यातून शेतकऱ्यांच्या मदतीसाठी व पशुधन वाचवण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे डॉक्टर सुनील गदादे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श शासकीय उत्कृष्ट सेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तर पत्रकारितेच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन शासन दरबारी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असणारे याबरोबरच सामाजिक कार्यात अग्रेसर राहणारे पत्रकार क्षेत्रातील उल्लेखनीय असं नाव असलेले पत्रकार अक्षय विधाते यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श पत्रकार राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे तर आदर्श शिक्षिका म्हणून सौ.कविता आनंदकर यांनी शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल बहुमोल योगदानाबद्दल त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.आष्टी तालुक्यातील चार मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पान ६ वरून...

## उद्या परळी उपविभागीय

केवळ वेगवेगळ्या अनुदानाच्या घोषणा केल्या जातात मात्र शेतकऱ्यांच्या हातात भोपळा दिला जात आहे. सरकारमध्ये धनंजय मुंडे यांचे काही चालत नाही. त्यामुळेच की काय बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्याप पीक विमा मिळाला नसल्याचे म्हटले आहे. बीड जिल्ह्यात महाराष्ट्रातील सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. अनेक आत्महत्यांची प्रशासन नोंद सुद्धा घेत नाही असा आरोप करीत रश्मी मंदानाला बोलावून तिच्यावर कोट्यावधी रुपये खर्च करण्यापेक्षा कृषीमंत्र्यांनी शेतकऱ्यांचे अश्रू पुसावेत असे आवाहन शेतकरी संघर्ष समितीच्या पत्रकार परिषदेत उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांनी केले. २३ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य अशा ट्रॅक्टर, बैलगाडी शेतकरी हक्क मोर्चात परळी येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना, अंबाजोगाई येथील साखर कारखाना तसेच पनगेश्वर शुगर मिल परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून शेतकरी, शेत मंजूर यासह नागरीकांनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राजेभाऊ फड यांनी केले.

## मनिषा तोकले

दोन दिवस सुरु असलेल्या या बैठकीत शेतकरी, उसतोड व इतर असंघटित महीला कामगार मंचाची थापना झाली. व महाराष्ट्र राज्याची कार्यकारीणी जाहीर करण्यात आली. अध्यक्ष मनिषा तोकले , उपाध्यक्ष वैशाली पाटील, छाया पडघम, रंजना कान्हेरे, सरिता मेश्राम, शर्मिला केदार, सचिव क्रांती खळगे, भेटी पाडवी, प्रमिला पात्र, सदस्य ज्योती थोरात, रेखा हाते, मानसेवी सदस्य सिमा कुलकर्णी, शुभदा देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.

cmyk

# यंदाच्या खरीप हंगामात तांदूळ, डाळींच्या उत्पादनात वाढ

## कापसाच्या उत्पादनात घसरण होण्याचा अंदाज !

पुणे : यावर्षीच्या २०२४ खरीप हंगामात भात, मका आणि कडधान्यांचे उत्पादन मागील वर्षीच्या तुलनेत वाढण्याची अपेक्षा आहे असा अहवाल कृषी मंत्रालयातर्फे देण्यात आलेला आहे. यावर्षीचा दीर्घ कालावधीच्या मान्सून यामुळे सरासरीपेक्षा ६.४% जास्त पाऊस पडलेला आहे.

कृषी मंत्रालयाच्या मूल्यांकनानुसार गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी भात, मका आणि कडधान्यांचे उत्पादन वाढण्याची अपेक्षा आहे, तर लागवड क्षेत्र कमी झाल्याने कापसाचे उत्पादन मात्र घसरण्याची शक्यता आहे. या खरीप हंगामासाठी विशेषतः तांदूळ आणि मक्याचे आशादायक उत्पादन असण्याची शक्यता आहे. तथापि, पीक विविधतेमुळे या हंगामात कापसाचे एकरी उत्पादन कमी राहण्याची अपेक्षा आहे. यावेळी भाताची पेरणी ४% पेक्षा जास्त म्हणजेच ४१ दशलक्ष हेक्टर झाली आहे.

मागील वर्षी कापसाची लागवड १२.३६ दशलक्ष हेक्टर होती जी यावर्षी ९% ने घटून ११.२४ दशलक्ष हेक्टर झाली आहे. कृषी मंत्रालय सध्या २०२४-२५ पीक वर्षासाठी पिकांचे पहिले आगाऊ अंदाज तयार करण्यासाठी भागधारकांसोबत अनेक बैठका घेत आहे.



''आमचे एकूण तांदूळ उत्पादन पूरस्थिती असूनही गेल्या वर्षीपेक्षा जास्त असेल कारण यावर्षी भाताची लागवड जास्त झाली आहे,'' असे शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले आहे. कृषी मंत्रालयाच्या अंदाजानुसार देशात तूर आणि मूग उत्पादनाचा स्थिती मजबूत आहे. १२.८ दशलक्ष हेक्टर क्षेत्रावरील कडधान्ये तूर, उडीद आणि मूग पेरणी क्षेत्रात वर्षभरात ७.८% वाढ झाली आहे. व्यापाऱ्यांच्या सांगण्यानुसार तूर उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त असण्याची शक्यता असली तरी, प्रमुख उत्पादक क्षेत्रांमध्ये अतिरिक्त पावसामुळे उडीद उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. एका आठवड्यापूर्वी, १०९.६६ दशलक्ष हेक्टरवर, भात, कडधान्ये, तेलबिया, भरड तृणधान्ये, कापूस आणि उसाची पेरणी गेल्या वर्षाच्या तुलनेत २.२% वाढली होती. कापसाचा अपवाद वगळता या हंगामात भात, तेलबिया, भरड तृणधान्ये आणि उसाची पेरणी सामान्य पेरणी क्षेत्रापेक्षा जास्त झाली आहे.

कृषी मंत्रालयाने २०२४-२५ मध्ये ३४० दशलक्ष टन विक्रमी अन्नधान्य उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवले आहे, जे मागील पीक वर्षात अंदाजित ३२८.८ पेक्षा ३.४% जास्त आहे. यामध्ये खरीप हंगामातील १५९.९७ मेट्रिक टन, रब्बी हंगामातील १६४ मेट्रिक टन आणि उन्हाळी हंगामातील १६.४३ मेट्रिक टन उत्पादनाचा समावेश आहे. केंद्रीय जल आयोगाच्या बातमीनुसार देशातील १५५ प्रमुख जलाशयांची क्षमता त्यांच्या क्षमतेच्या ८७% पर्यंत भरली आहे.

## प्रभावी तण नियंत्रणाच्या योग्य पद्धती



पीक उत्पादनामध्ये मशागतीपासून तर काढणीपर्यंत तण नियंत्रण हा एक महत्वाचा घटक आहे. पीकानुसार वेगवेगळ्या प्रकारची तणे आढळतात. सद्यस्थितीमध्ये तणनाशके फवारली तरीही तण नियंत्रण होत नाही असे दिसत आहे अशावेळी तणनाशकांची फेरपालट करणे जरुरीचे ठरते. जशी आपण पिकाची फेरपालट करतो त्यामुळे मातीचा पोत उत्तम राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे तणनाशकांचा फेरपालटीत वापर केला तर तणांस अटकाव होऊ शकतो.

तण नियंत्रणामधील महत्त्वाचे घटक : जमिनीचा प्रकार. पाण्याची उपलब्धता. पिकांमधील अंतर आणि वाढीचा वेग. खत देण्याच्या पद्धती. मनुष्यबळाची उपलब्धता. पूर्वीचे आणि नंतरचे घेण्यात येणारे पिक. तणनाशका बद्दलचे ज्ञान आणि कुशलता.

तण नियंत्रणाचे प्रकार : पीक लागवडीच्या पद्धती - पिकांची फेरपालट, जोमाने वाढणाऱ्या पिकांची निवड, खत आणि पाणी देण्याच्या पद्धती.

यांत्रिकी - खुरपणी, कोळपणी, नांगरणी इत्यादी : तण नाशकांचा वापर : पेरणीपूर्वी, पेरणीनंतर परंतु पीक उगवण्यापूर्वी आणि पीक उगवल्यानंतर वापरण्यात येणारी तणनाशके.

जैविक तण नियंत्रण : यामध्ये जैविक घटकांचा वापर करून तण नियंत्रण करू शकतो.

पिकातील तण नियंत्रणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कालावधी : सोयाबीन, मका, ज्वारी, बाजरी १५ ते ४५ दिवस. तूर आणि कापूस - १५ ते ९० दिवस. मूग आणि उडीद - पंधरा ते तीस दिवस. ऊस - तीस ते नव्वद दिवस. हळद आणि आले - तीस ते १२० दिवस.

तणनाशके फवारताना घ्यावयाची काळजी : प्रत्येक वेळी पंप स्वच्छ धुणे आवश्यक आहे. निवडक तणनाशकांचा वापर करताना मात्रा आणि वेळ महत्त्वाची. वाऱ्याची दिशा लक्षात घेऊन फवारणी करणे आवश्यक. पंपाची कार्यक्षमता तपासून तणनाशकांची मात्रा ठरवणे. तणनाशकांच्या फवारणीसाठी डब्ल्यू एफ एन नोझलचा वापर करावा.

अशा सर्व बाबींचा विचार करून तणनाशकांचा वापर केल्यास तणांवर नियंत्रण आणू शकतो. शक्यतो तणनाशक जेवढी मात्रा दिली आहे तेवढेच वापरावे, एकच तणनाशक पुन्हा पुन्हा एकाच पिकामध्ये वापरले तर त्या तणनाशकाने तण नियंत्रण काहीश्या प्रमाणात कमी होताना दिसते आहे यामध्ये आपण तणनाशकांची फेरपालट केली तर नियंत्रणासाठी त्याचा फायदा होऊ शकतो.

## पृथ्वी रक्षणासाठी बांबू शेती उपयुक्त-पाशा पटेल

मुंबई : जागतिक तापमानातील वाढ, वातावरणातील बदल आणि कार्बन उत्सर्जनाच्या वाढत्या प्रमाणामुळे मानवजाती व पृथ्वी धोक्याच्या उंबरठ्यावर आहे. या मानवजाती व पृथ्वीला वाचविण्यासाठी बांबू शेती करणे अत्यंत उपयुक्त ठरेल, असे मत जागतिक बांबू दिनानिमित्त आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी व्यक्त केले.



या कार्यक्रमाला पद्मश्री पुरस्कार प्राप्त भारत भूषण त्यागी, कमल सिंग, गेनाजी चौधरी, सुलतान सिंग, चंद्रशेखर, जगदीश प्रसाद पारेख, 'मनरेगा'चे महासंचालक नंदकुमार, प्रधान सचिव प्रवीण दराडे आदी उपस्थित होते.

पाशा पटेल म्हणाले, ''भारतातील राज्यांमध्ये तापमानात वाढल्याची नोंद झाली आहे. दुबईत सुद्धा प्रचंड तापमानात वाढ झाली आहे. कार्बन उत्सर्जनामुळे ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत चालले आहे. ऑक्सिजन वाढविण्यासाठी झाडे लावल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हरित ऊर्जेच्या दिशेने पाऊल टाकले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने हरित महाराष्ट्र बनविण्यासाठी ठोस निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे शाश्वत उत्पन्नासाठी बांबू शेतीची संधी शेतकऱ्यांना मिळाली आहे. शेतकऱ्यांनी कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारी आणि सर्वाधिक ऑक्सिजन निर्माण करणारी बांबू शेती करण्याची गरज आहे. या चर्चासत्र कार्यक्रमामुळे शेतकरी, शास्त्रज्ञ आणि सरकार यांना एका छताखाली आल्याने मोठी संधी उपलब्ध झाली आहे. बांबू शेतीसाठी महाराष्ट्रातच नाही तर देशभरात काम करावे लागेल.''

भारत भूषण त्यागी म्हणाले, ''महाराष्ट्रात होत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. पर्यावरण संवर्धनासाठी मानवी चेतना जागृत करण्याची गरज आहे. बांबू हे केवळ झाड नसून नैसर्गिक संरचनेतील महत्त्वाचा अंग आहे. बांबू शेतीची महाराष्ट्रातून पायाभरणी होत आहे.'' या वेळी 'एमआरईजीएस'चे महासंचालक नंदकुमार, प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी राज्य शासनाच्या 'हरित महाराष्ट्र' या योजनेविषयी माहिती दिली. या कार्यक्रमात राजस्थान, गुजरात, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, झारखंड, आसाम, पंजाब, मध्य प्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल आदी राज्यांतील प्रगतिशील शेतकरी, आयआयटी दिल्ली, खरगपूर, विविध संशोधन संस्थांमधील शास्त्रज्ञ, उद्योजक, शेतकरी उपस्थित होते.

## गोव्यातील विक्री केंद्रे खरेदी करणार महाराष्ट्रातील भाजीपाला, फळे

पणजी : गोवा राज्य सरकारच्या फळे व भाजीपाला विक्री केंद्राला महाराष्ट्रातील फळे व भाजीपाला खरेदीसाठी मान्यता देताना, त्यासाठी लवकरच आवश्यक ती लिंकिंगची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन गोव्याचे माजी मुख्यमंत्री तथा कृषिमंत्री रवी नाईक यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाला दिले.

गोवा सरकारच्या वतीने गोव्यातील नागरिकांसाठी भाजीपाला आणि फळे विक्री केंद्रे उभारण्यात आलेली आहेत. हा उपक्रम देशात फक्त गोवा राज्यातच राबविला जात आहे. या विक्री केंद्रांना भाजीपाला आणि फळे पुरवण्यासंबंधाने 'मोर्फा'चे अध्यक्ष अंकुश पडवळे यांच्यासह प्रकाश भोसले,



शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष जयराम आलदर, दूध संस्थेचे अध्यक्ष भगवानराव चौगुले, माजी सरपंच संतोष वाले आदींनी गोवा फलोत्पादन महामंडळाचे अध्यक्ष, आमदार परमेंद्र शेट यांच्यासह कृषिमंत्री नाईक यांच्याशी फळे व भाजीपाला पुरवठ्याबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच त्यातील अडचणीबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. पहिल्या टप्प्यात फळे पुरवठा करण्याचा निर्णय झाला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने भाजीपाला पुरवठा करण्याबाबत या वेळी ठरवण्यात आले. या बैठकीत गोवा कृषी विभागाचे संचालक संदीप देसाई, गोवा राज्य फलोत्पादन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक चंद्रहास देसाई, व्यवस्थापक प्रसाद परब आदी बैठकीस उपस्थित होते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४९९ : बेसलचा तह स्वित्झर्लंड स्वतंत्र राष्ट्र बनले.
१६६० : शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरुन पन्हाळगड सिद्दी जौहरच्या ताब्यात देण्यात आला.
१८८८ : 'द नॅशनल जिऑग्रॉफिक' या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९३१ : नेपाळ-राजपुत्र हेमसमशेर जंगबहादुर राणा यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भेट घेतली.
१९६५ : दुसरे काश्मीर युद्ध संयुक्त राष्ट्रसंघाच्या युद्धबंदी आदेशानंतर भारत पाकिस्तान मधील दुसरे काश्मीर युद्ध थांबले.
१९८० : इराकने इराण पादाक्रांत केले.
१९८२ : कलावैभव निर्मित, जयवंत दळवी लिखित व रघुवीर तळाशिलकर दिग्दर्शित 'पुरुष' या नाटकाचा पहिला प्रयोग दादर येथील शिवाजी मंदिर येथे झाला.
१९९५ : श्रीलंकेच्या हवाई दलाने नागरकोवेल येथे एका शाळेवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात कमीतकमी ३४ जण ठार झाले. यातील बहुसंख्य तामिळ विद्यार्थी होते.
१९९५ : घरात अथवा कार्यालयात राष्ट्रध्वज फडकाविण्याचा अधिकार सर्वसामान्य नागरिकास असल्याचा दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय
१९९८ : क्रिकेटपटू सुनील गावसकर यांना 'महाराष्ट्र भूषण' हा महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च सन्मान जाहीर
२००३ : नासाच्या गॅलिलिओ या अंतराळ यानाने गुरूच्या वातावरणात प्रवेश करीत प्राणार्पण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९१ : मायकेल फॅरेडे इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २५ ऑगस्ट १८६७)
१८२९ : व्हिएतनामचा राजा टू डुक यांचा जन्म.
१८६९ : व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री कायदेतज्ञ, सूक्ष्मबुद्धीचे राजकारणी, भारत सेवक समाजाचे अध्यक्ष आणि इंग्रजी वक्ते (मृत्यू: १७ एप्रिल १९४६)
१८७६ : फ्रांसचे पंतप्रधान आंद्रे तार्द्यू यांचा जन्म.
१८७८ : जपानचे पंतप्रधान योशिदा शिगेरू यांचा जन्म.
१८८५ : ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान बेन चीफली यांचा जन्म.
१८८७ : कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणतज्ञ, बहुजनसमाजातील तळमळीचे कार्यकर्ते, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण (मृत्यू: ९ मे १९५९)
१९०९ : दत्तात्रय तुकाराम तथा 'दत्तू' बांदेकर ऊर्फ 'सख्याहरी' विनोदी लेखक, विडंबनकार व स्तंभलेखक (मृत्यू: ३ आक्टोबर १९५९)
१९१५ : अनंत माने पाच तपांहुन अधिक काळ चित्रपटसृष्टीसाठी व्यतीत करणारे व मराठी चित्रपटसृष्टीवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे दिग्दर्शक. 'पिंजरा', 'लक्ष्मी', 'सुशीला', 'आई' हे त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत. 'अनंत आठवणी' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: ९ मे १९९५)
१९२२ : नोबेल पारितोषिक विजेते चिनी भौतिकशास्त्रज्ञ चेन निंग यांग यांचा जन्म.
१९२३ : ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व उद्योगपती रामकृष्ण बजाज यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३९ : गुरू नानक देव शिख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू (जन्म: १५ एप्रिल १४६९)
१९५२ : फिनलंड देशाचे पहिले अध्यक्ष कार्लो जुहो स्टॅहल्बर्ग यांचे निधन. (जन्म: २८ जानेवारी १८६५) रसायनशास्त्रज (जन्म: २ सप्टेंबर १८७७)
१९५६ : नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश रसायनशास्त्रज फ्रेडरिक सॉडी यांचे निधन. (जन्म: २ सप्टेंबर १८७७)
१९७० : शरदेंन्दू बंदोपाध्याय बंगाली लेखक (जन्म: ३० मार्च १८९९)
१९९१ : दुर्गा खोटे हिन्दी व मराठी चित्रपटातील अभिनेत्री. सुमारे ५० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ३०० हून अधिक चित्रपटांत भूमिका केला. १९८२ मध्ये 'मी दुर्गा खोटे' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. (जन्म: १४ जानेवारी १९०५)
१९९४ : जी. एन. जोशी भावगीतगायक व संगीतकार. एच. एम. व्ही. या कंपनीत काम करत असताना त्यांनी अनेक नवीन गायकांना संधी देऊन त्यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या. (जन्म: ६ एप्रिल १९०९)
२०११ : मन्सूर अली खान पतौडी भारतीय क्रिकेट कप्तान आणि पतौडी संस्थानचे ९ वे व शेवटचे नबाब (जन्म: ५ जानेवारी १९४१)

# जाणून घ्या मुक्तसंचार गोठापद्धतीचे फायदे

आपल्याकडे शक्यतो बंदिस्त गोठा पद्धतीनुसारच पशुपालन करण्याची प्रथा आहे. पण बंदिस्त गोठ्यासाठी काही मर्यादा येतात यासाठी मुक्तसंचार गोठा पद्धत अलिकडे लोकप्रीय होत चालली आहे.

बंदिस्त गोठ्याच्या मर्यादा : दुग्ध व्यवसाय यशस्वी करण्यासाठी काही महत्वाच्या गोष्टींबाबत जसे जनावरांचे आजार, त्यांचा माज याविषयी सतर्क राहणे आवश्यक असते.

बंदिस्त गोठ्यात दुधाळ जनावरांना थायलेरियासीस, कासदाह, किटोसिस हे मुख्य ३ आजार होतात. बंदिस्त गोठ्यात गोचिडांना लपण्यास भरपूर जागा असते. त्यांच्यामुळे जनावरांना विविध रोग होतात. बंदिस्त गोठ्यात जनावर जेथे उभे राहते तेथे शेण, मल-मूत्र पडत असल्याने ती जागा कायम ओली राहते. त्यावर काडीकचरा पडलेला असतो. त्यावरच जनावरे बसतात. त्यामुळे कासदाह रोग होतो. गायी-म्हशी मुका माज दाखवितात. बंदिस्त गोठ्यात ही गोष्ट लक्षात येत नाही; मात्र मुक्त संचार गोठा पद्धतीत अशा गाईला ओळखणे सोपे होते. माजाची लक्षणे लगेच ओळखता येतात आणि माज ओळखता येणे हेच तर दुग्ध व्यवसाय यशस्वी होण्यामागील कारणांपैकी एक गमक आहे. यातून मुक्तता मिळावी म्हणून मुक्त



संचार गोठा पद्धत वापरली जाते.

मुक्तसंचार गोठा पद्धत म्हणजे काय : मुक्तसंचार गोठ्या मध्ये गाईंना बांधले जात नाही. गाईंना एका मोठ्या कंपाऊंड मध्ये शेड बांधून मोकळे सोडले जाते. त्यांच्या चाऱ्याची व पाणी पिण्याची व्यवस्था तिथेच गव्हाणा मध्ये करण्यात येते. शेण वारंवार काढले जात नाही. गाई एकमेकांना मारत नाहीत. एका गाईला किंवा म्हैशीला मुक्त संचार पद्धतीच्या गोठ्यात मोकळे सोडण्यासाठी कमीत कमी २०० चौ. फूट जागा लागते. एक गुंठा जमीन क्षेत्रात आपण पाच मोठी जनावरे मोकळी सोडू शकतो. गाईला मुक्त सोडण्या पूर्वी तार जाळीचे किंवा भिंतीचे अर्ध्या जाळीयुक्त कंपाउंड करून आत मध्ये गव्हाण व पाण्याच्या हौदाची व्यवस्था करणे आवश्यक असते. गाईला मोकळे सोडल्यावर एक ते दोन दिवस मुक्त पद्धतीची सवय लागण्यात जातात. या कालावधीत शेतकऱ्याने सतर्कता बाळगायला हवी. गाई मोकळ्या सोडल्यावर त्या एकमेकींना मारतील या भीतीने शेतकरी मुक्त गोठा पद्धत अवलंब करण्यापासून माघार घेतात. परंतु पहिले दोन दिवस सवय लागल्यावर गाई एकमेकांना मारत नाहीत. जर एखादी गाय इतर गाईंना मारत असेल तर तिला पायकूट घालून आपण प्रतिबंध करू शकतो. गाईच्या तोंडाच्या म्होरकीला एक बाज व कोणत्याही एका पायाच्या गुडघ्याच्या थोडेसे वर असे दोरीच्या साहाय्याने आखडून बांधणे म्हणजेच पायकूट घालणे होय. अशा प्रकारे आपण जनावरांच्या हालचालीवर प्रतिबंध घालू शकतो. याशिवाय सावली आणि ऊन, पिण्याचे पाणी, चारा आणि तेथेच दूध काढण्याची सोय उपलब्ध केल्यामुळे त्यांना पाहिजे त्या वेळी त्यांच्या आवडीनुसार आणि वेळेनुसार चारा खातात, पाणी पितात, हवामानातील बदलानुसार ऊन-सावली घेतात, स्वच्छ जागेत जाऊन बसतात, त्यामुळे त्यांच्या शरीराला शेण लागत नाही, स्वच्छंदाने त्या फिरतात. त्यांच्या इच्छेनुसार निवांत बसून चांगले रवंथ करतात. त्यामुळे दुधाचे उत्पादन वाढते. त्यांना फिरता येत असल्यामुळे नखे वाढत नाहीत, गोचीड होत नाहीत, आजाराचे प्रमाण कमी होते. मोकळ्या सोडलेल्या गाईंच्या अंगावर एक वेगळी चकाकी येते. त्यांनी दिलेल्या दुधातील जैविक घटकांमध्ये निश्चितच बदल होत असतील.

मुक्त संचार गोठा पद्धतीचे फायदे : स्वच्छतेसाठी कमी वेळ लागतो व मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होते. कमी मनुष्यबळ लागते. गोठे बांधण्यावरील खर्च कमी होतो. खाद्य,चारा व पाणी यांचा योग्य उपयोग होतो. जनावरांना व्यायाम मिळाल्याने ते निरोगी राहतात. स्तनदाहाचे प्रमाण कमी होते. जनावरे मुक्तपणे माज दाखवतात. ताण कमी होतो आणि उत्पादनात ५ ते १० टक्के वाढ होते. प्रजननासंबंधी समस्या कमी होतात. खुरांची योग्य निगा राखल्याने जनावरे लंगडत नाहीत. जनावरांची झपाट्याने वाढ होते व उत्पादन वाढते.

# ब्रह्माकुमारीजमध्ये दृष्टीकोन बदलायला शिकवतात -पियुषभाई

अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, आनंद सरोवर, वाघाळा रोड, योगेश्वरी नगरी जवळ, अंबाजोगाई केंद्रात शुक्रवार, दिनांक २० सप्टेंबर रोजी प्रकृति, पर्यावरण एवं आपदा प्रबंधन जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले होते. या अभियानातून पर्यावरण संवर्धनाचा मौलिक संदेश देण्यात आला.

राज्यातील सोलापूर, उमरगा, उदगीर, लातूर, बीड, धाराशिव, बार्शी, अकलूज, पंढरपूर आणि अंबाजोगाई शहरात १५ ते २५ सप्टेंबर या कालावधीत प्रकृति, पर्यावरण एवं आपदा प्रबंधन जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. अंबाजोगाई केंद्रांतर्गत रेणापूर (जि.लातूर), परळी वैजनाथ आणि अंबाजोगाई शहरात विविध महाविद्यालय व सेवा केंद्रासह एकूण १४ ठिकाणी हे अभियान प्रवचन, प्रदर्शनी, दृकश्राव्य माध्यम शो, स्लाईड शो, गीत-संगीत, स्लोगन्स आदींचा आधार घेऊन व्यापकपणे राबविण्यात आले. समाजात जनजागृती करण्यासाठी हे सध्या अभियान उपयुक्त ठरत आहे. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, आनंद सरोवर येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्र.कु.प्रताप भाई (नि.सहा.मुख्य अभियंता, जल संधारण विभाग), तर मुख्य वक्ता म्हणून राजयोगी ब्रह्माकुमार पियुष भाई दिल्ली (झोनल कोऑर्डिनेटर एसईए प्रभाग) हे होते. यावेळी




व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.बी.वाय.खडकभावी (प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालय, अंबाजोगाई.), ऍड.श्रीकृष्ण तोष्णीवाल (अध्यक्ष, बीड जिल्हा माहेश्वरी सभा, अंबाजोगाई.), कल्याण काळे (अध्यक्ष, रोटरी क्लब, अंबाजोगाई सिटी.), राजयोगिनी ब्रह्माकुमारी अस्मिता (कार्यकारी सदस्या एसईए प्रभाग.), बी.के.नरेंद्र पटेल बडोदा (कार्यकारी सदस्य, एसईए प्रभाग), राजयोगिनी ब्रह्माकुमारी संगीता (संचालिका, बार्शी सेवाकेंद्र), बी.के.महेश भाई, इंदौर (सदस्य, एसईए प्रभाग), बी.के.सुप्रिया बहन (माऊंट आबू-राज), बी.के.दिनेश भाई (माऊंट आबू-राज), बी.के.धनंजय भाई (माऊंट आबू-राज), बी.के.विष्णू भाई (माऊंट आबू-राज), बी.के.श्रीनिवास भाई (माऊंट आबू-राज), राजयोगिनी ब्रह्माकुमारी महानंदा (संचालिका, उदगीर सेवाकेंद्र) आणि अंबाजोगाई केंद्र संचालिका ब्रम्हाकुमारी सुनीता बहेनजी या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी राजयोगी बी.के.निर्वैर भाई यांचे दुःखद निधन झाल्यामुळे त्यांच्या पवित्र स्मृतीस श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर राजयोगिनी ब्रह्माकुमारी महानंदा दिदी यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त करून बी.के.निर्वैर भाई यांचे सेवाकार्य, योगदान याविषयी माहिती देवून शोक संवेदना व्यक्त केल्या. त्यानंतर ब्र.कु.प्रताप भाई यांनी प्रास्ताविक केले. बी.के.निर्वैर भाई यांचे विषयी आपले अनुभव कथन केले. मुख्य वक्ता म्हणून राजयोगी ब्रह्माकुमार पियुष भाई (दिल्ली) यांनी प्रकृती पर्यावरण व आपत्ती व्यवस्थापन जनजागृती अभियानाचा विधायक उद्देश सांगितला. याप्रसंगी त्यांनी ''आपदा प्रबंधन में सकारात्मक चिंतन का महत्व'' या विषयावर मौलिक मार्गदर्शन करताना ग्लोबल वार्मिंग, आण्विक शस्त्रांचा वापर, अणुबॉम्बमुळे मानवी जीवन बाधित होत आहे. जल, जंगल, जमिन, हवेचे प्रदूषण होत आहे. त्याचं कारण म्हणजे वाढते प्रदूषण व जंगलतोड हे आहे. त्यामुळे पृथ्वीवर अनेक प्रकारच्या आपत्ती येत आहेत. भूकंप, वादळ, महापूर त्सुनामी यामुळे मानवी हानी होत आहे. याला आळा घालण्यासाठी पृथ्वीचे संवर्धन केले पाहिजे, झाडे लावून जतन केले पाहिजे, प्रदूषण होणार नाही अशा उपायोजना केल्यास पर्यावरणाचे संवर्धन होईल. माणसाने आपले वर्तन बदलावे, आपण सुधारलो तरच जग सुधारेल. विज्ञान आणि अध्यात्म हे परस्परपूरक आहे. स्वपरिवर्तन झाल्यास विश्व परिवर्तन होईल. आम्हाला शाश्वत विकास हवा आहे. मागील ३० वर्षांपासून ब्रम्हाकुमारीज हे पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करीत आहे. स्वार्थाऐवजी पुरूषार्थ व परमार्थ यांना प्राधान्य द्यावे लागेल. सकारात्मक विचार जोपासा, ब्रह्माकुमारीज मध्ये दृष्टीकोन बदलायला शिकवतात असे प्रतिपादन ब्रम्हाकुमार पियुषभाई यांनी केले. यावेळी अस्मिता बहेनजी यांनी योग विधी याचे महत्त्व सांगितले. तर संगिता बहेनजी यांनी पर्यावरण संवर्धनासंदर्भात प्रतिज्ञा दिली. प्राचार्य डॉ.बी.वाय.खडकभावी व ऍड.श्रीकृष्ण तोष्णीवाल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजू बहेनजी यांनी केले तर उपस्थितांचे आभार अंबाजोगाई केंद्र संचालिका ब्रम्हाकुमारी सुनीता बहेनजी यांनी मानले. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला, पुरूष, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजक, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, आनंदसरोवर, अंबाजोगाई व वैज्ञानिक व अभियंता प्रभाग, राजयोग शिक्षा व शोध प्रतिष्ठान, माऊंट आबू, राजस्थान यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

## थोडक्यात



### घाटनांदुर येथे गणेश उत्सवानिमित्त व्याख्यान

घाटनांदुर प्रतिनिधी अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथील लक्ष्मी शूर विद्यालय व आदर्श प्राथमिक विद्यालय या शाळेमध्ये गणेश उत्सवाच्या निमित्त व्याख्यान आयोजन करण्यात आले होते या व्याख्यानाला जाधव कोचिंग क्लासेसचे संचालक नर्सिंग जाधव ,वसुंधरा महाविद्यालयाचे प्रा. जगन्नाथ तुडमे डायट कॉलेज अंबाजोगाईचे योगेश सुरवसे तसेच कवी रमेश मोठे अशा वेगवेगळ्या अनेक विचारवंताने विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून लाभलेले श्री लक्ष्मेश्वर विद्यालय चे मुख्याध्यापक श्री अविनाश शेटे व गोविंद सोनपीर व सर्व शिक्षक कर्मचारी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा मिळावी यासाठी व्याख्यानाचे आयोजन संस्था सचिव श्री विजयकुमार नागरगोजे व डॉ. सरस्वती नागरगोजे यांचे विशेष प्रयत्नातून हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला यावेळी शिक्षक कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खोलेश्वर महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्राचा शुभारंभ




अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिनांक वीस सप्टेंबर २०२४ येथील खोलेश्वर महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र उद्घाटन शुभारंभ ऑनलाइन कार्यक्रम देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन प्रणाली द्वारे संपन्न झाला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बिभीषण फड ,उपप्राचार्य डॉ. दीपक फुलारी, उपप्राचार्य आनंद पाठक, उप प्राचार्य डॉ. रवींद्र कुंबेफळकर कौशल्य विकास केंद्राचे नोडल ऑफिसर श्री. जयदत्त इंगोले यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राची माहिती याबाबतीत देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी ऑनलाइन द्वारे विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासंबंधी मार्गदर्शन केले.कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच प्राध्यापक बंधू भगिनी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमास सहभाग घेतला. तसेच यावेळी उपस्थित पाहुण्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले. तर आभार डॉ. दीपक फुलारी यांनी व्यक्त केले

# वसुंधरा महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्राचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

घाटनांदुर। प्रतिनिधी

येथील वसुंधरा महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागद्वारा आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्राचे उद्घाटन देशाचे मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दुरदृश्य प्रणाली द्वारे झाले.



यावेळी महामहीम राज्यपाल मा. सी.पी. राधाकृष्णन, मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, केंद्रीय मंत्री मा. नितीनजी गडकरी, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडवणीस व उपमुख्यमंत्री मा. अजित जी पवार, पालकमंत्री मा. धनंजय जी मुंडे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मा. मंगलप्रभातजी लोढा कामधेनू सेवाभावी संस्थेचे सचिव व डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य गोविंदराव देशमुख सह जिल्ह्यातील खासदार व आमदार दूरदृश्य प्रणाली द्वारे कार्यक्रमाला उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला कामधेनू सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब देशमुख, उपाध्यक्ष डॉ.अब्दुल समद,भाजपा जिल्हा सरचिटणीस नेताजीराव देशमुख,सरपंच महेशवैजनाथ आप्पा गारठे, दत्ता काका जाधव संस्थेचे संचालक बाबासाहेब देशमुख, वामनराव जाधव, थोरात साहेब,प्र. प्राचार्य डॉ. अर्जुन मोरे सह पदाधिकारी उपस्थित होते.तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी,विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वसुंधरा महाविद्यालयात अकाउंटिंग एक्सक्यटीव्ह व गेस्ट सर्विस असोसिएट या कोर्सला मान्यता भेटली आहे. या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी बारावी पास असणे आवश्यक आहे. यासाठी दहावी-बारावीचे गुणपत्रक, पासपोर्ट फोटो, पॅन कार्ड, मोबाईल नंबर, ईमेल आयडी आवश्यक आहे. कोर्सला प्रवेश मोफत आहे.या कोर्सची सर्व माहिती उपस्थितांना प्रा. डॉ .मकरंद जोगदंड यांनी दिली. तरी इच्छुकांनी महाविद्यालयात संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे सचिव व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य गोविंदराव देशमुख, प्रभारी प्राचार्य डॉ. अर्जुन मोरे यांनी केले आहे.

# रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलकडून वृक्षारोपण



माजलगाव। प्रतिनिधी

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ कडून ११ जिल्ह्यात ५ लक्ष वृक्ष लागवडीचा संकल्प असून त्यात माजलगाव रोटरी सेंट्रल ने हरित माजलगाव या संकल्पनेतून माजलगाव शहर व परिसरातील वसाहतीत मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येत आहे. त्यातील दुसऱ्या टप्प्यात दि २१ सप्टेंबर शनिवार रोजी शहरालगत असलेल्या शिवशारदा कॉलनीत रस्त्याच्या दुतर्फा ट्री गार्ड सह वृक्षारोपण करण्यात आले.

फुले पिंपळगाव रोड वरील केसापुरी कॅम्प लगत शिवशारदा नगरी ही नवीन वसाहत विकसित झाली असून त्या ठिकाणी आज रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल व शिवशारदा कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने ३०० मिटर अंतरात रस्त्याच्या दोन्ही बाजूस भारत आबा सोळंके व शहाजीराव शेजूळ यांचे हस्ते आंबा व नारळाची मोठी झाडे लावण्यात आली त्याच बरोबर त्या सर्व झाडांना लोखंडी संरक्षक जाळया बसवण्यात आल्या आहेत.वृक्षारोपणाच्या या कार्यक्रमात रोटरी अध्यक्ष रो. पांडुरंग चांडक व सेक्रेटरी रो.प्रभाकर शेटे यांनी पर्यावरण संतुलनात वृक्ष लागवडीचे महत्व व रोटरी इंटरनॅशनल ची भूमिका विषद केली व हा परिसर हरित करण्यासाठी कॉलनीतील नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

यावेळी कार्यक्रमाचे संयोजक अरविंद देशमुख यांनी रोटरी क्लब च्या सर्व सदस्यांचे ग्रंथ भेट देऊन हार्दिक स्वागत केले.कार्यक्रमास जेष्ठ नागरिक संदीपान भाऊ सोळंके सह कॉलनीतील अच्युतराव शेजूळ अशोकराव शेजूळ महेश ठोंबरे नवनाथ शिंगणे सचिन मगर सह प्रोजेक्ट चेअरमन रो.सुदर्शन थावरे रो. आनंद शिंदे व रो.अण्णासाहेब तौर रो. नीलकंठ साबळे,रो.नारायण गंडे रो.कैलास येलशेट्टी रो.उमाकांत सोळंके रो.अंकुश राठोड व वसंतराव पाटील इत्यादी रोटरी सदस्य उपस्थित होते.

# नैतिकता ही सांगण्याची नाहीतर आचरणात आणण्याची बाब-डॉ पाटंगणकर

माजलगाव। प्रतिनिधी

नैतिकतेचे अध:पतन होत आहे. मनावर नियंत्रण नैतिकता ठेवते. बाहेरच्यापेक्षा अंतरंग महत्वाचे आहे. गैरवर्तणुकी बद्दल भीती असावी. नैतिकतेची शिकवण घरातून द्यावी. नैतिकता ही सांगण्याची नाहीतर आचरणात आणण्याची बाब आहे असे प्रतिपादन डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांनी सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेत तिसरे पुष्पगुंफताना व्यक्त केले.




सुंदरराव सोळंके यांच्या जयंती निमित्ताने सुंदरराव सोळंके महाविद्यालयात तीन दिवसीय व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांनी गुंफले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सत्यप्रकाश रुद्रवार होते. यावेळी प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रा. स्नेहल पाठक, सौ. रेणुका पाटंगणकर, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, मराठी विभागप्रमुख डॉ.भाऊसाहेब राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ''वर्तमान समाज व्यवस्था व नैतिकता'' या विषयावर बोलताना डॉ.पाटंगणकर म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण होत आहे तसेच रामाच्या नावाचा जप करून भोंदू बाबा लोकांना भुलवतात. काही आश्रम हे शोषणाचे केंद्र होत आहेत. अशामुळे नैतिकतेची अध:पतन होत आहे. यावर बुद्धिवंतांनी नीतिमत्तेचा अंकुश ठेवावा असे सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. जी. के. सानप यांनी विद्यार्थ्यांना नीतिमत्ता विषयी समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. ए. कव्हळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले तर आभार प्रा. अशोक दौंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यार्थी- विद्यार्थिनी, पालक, प्राध्यापक,कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# जोड रस्ते ठरू लागले धोकेदायक

अंबाजोगाई। प्रतिनिधी

रस्त्याची कामे सुरू आहेत पण त्यात व्यवस्थितपणा नाही कारण एका रस्त्याला जोडणारा रस्ता हा दुरुस्त न केल्याने हे रस्ते धोकेदायक ठरत आहेत ते रस्ते दुरुस्त करण्याची मागणी नागरीक करीत आहेत

अंबाजोगाईतील नागरीक जागरूक असून कोणत्याही वेळेस चक्क उठाव करतात अनेक ठिकाणच्या मुख्य रस्त्यासह गल्लीबोळात नव्याने बनविलेले रस्ते एकास एक जोडत असताना त्यात जोड दिला नसल्याने ते रस्ते व्यवस्थित नाहीत त्यामुळे असे रस्ते नकोत असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहेत संबंधित कंत्राटदार राजकारण्याचे मात्र चांगभले होत आहे रस्त्यासाठी आंदोलन करणार असल्याचे नाटक पुढारी,समाजसेवक हे नेहमीच करतात पण ते पुन्हा मिटते

मात्र येथील भोळीभाबडी जनता जोड रस्ता व्यवस्थित नसल्याने दणके सहन करीत आहे पाऊस असो वा नसो पिण्याचे पाणी आठ दहा दिवसानंतर मिळते त्याचे दिवस कमी होत नाहीत खरे पाहता नियोजन जर केले तर हे प्रश्न सुटू शकतात पण त्यासाठी पाठपुरावा पाहीजे मुख्य म्हणजे ऐरणीवर असलेले प्रश्न एकदाच सोडविले तर पुन्हा निवडणुकीत करायचे काय ?यामुळेच जनतेची दिशाभूल करण्याचे काम केले जाते ते चालूच राहो मात्र किमान नव्या झालेल्या रस्त्यावर जोड रस्ते तरी दुरुस्त करून ते बुजवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे

# लोकनेते बाबुरावजी आडसकर जीवनगौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

धारूर । प्रतिनिधी

वसंत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या २७ वार्षिक सर्वसाधारण सभेचे धारूर शहरांमध्ये दि. २२ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाला माजलगाव मतदार संघाचे भाजपचे नेते रमेश आडसकर यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकनेते बाबुरावजी आडसकर जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला भाजप नेते रमेश आडसकर, धारूर चे माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूप सिंह हजारी, शेषराव फावडे, अर्जुनराव गायकवाड,



सुमंतराव डूबे, बाबुराव शिनगारे अध्यक्ष पेन्शनर्स, महादेव तोंडे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, सुनील शिनगारे उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, बाळासाहेब खामकर माजी नगरसेवक, बालासाहेब जाधव माजी नगरसेवक, डॉ.मयूर सावंत डॉक्टर असोसिएशन अध्यक्ष, संतोष शिरसाठ माजी नगरसेवक, सादेक इनामदार मराठवाडा अध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन, मदन धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सोहळा पार पडणार आहे. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आंबेजोगाई येथील नेत्र विभागाचे डॉ. एकनाथ बिरोबा शेळके यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये केलेल्या भरीव योगदानाबद्दल तसेच शेती क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम केल्याबद्दल प्रगतशील शेतकरी धर्मराज थोरात यांचा लोकनेते बाबुराव आडसकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे कार्यक्रमाचे आयोजन सुरेश शिनगारे चेअरमन, सुरेश कांबळे व्हाईस चेअरमन, बाळासाहेब घुगे सचिव,दत्तू यादव खजिनदार व वसंत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पतसंस्था सर्व संचालक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कुंबेफळ ग्रामपंचायत तालुक्यात प्रथम आणि जिल्ह्यात तृतीय

## संत गाडगे बाबा स्वच्छता अभियानात मिळवले ३ लाख ६० हजाराचे बक्षीस

केज। प्रतिनिधी

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान २०२३-२४ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत कुंबेफळ ग्रामपंचायत ने जिल्हा स्तरीय तृतीय क्रमांक पटकावला आहे.

जिल्हास्तरीय तपासणीसाठी प्रत्येक जि प गटातुन एक गाव निवडले जाते व त्यापैकी प्रत्येक तालुक्यातून एका गावाची निवड केली जाते. जिल्हास्तरीय तपासणीसाठी केज तालुक्यातून आपल्या कुंबेफळ गावाची निवड झालेली होती सदर स्पर्धेच्या अनुषंगाने दि १९ जुलै रोजी जिल्हास्तरीय पथका मार्फत तपासणी करण्यात आली होती बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती संगितादेवी पाटील मॅडम यांनी नुकताच या स्पर्धेचा निकाल घोषित केला आहे. यामध्ये कुंबेफळ ला जिल्ह्यातून तृतीय क्रमांक मिळाला आहे.आता लवकरच या स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा संपन्न होईल अन्? तो दिवस कुंबेफळच्या प्रत्येक नागरिकांसाठी अभिमानाचा असेल. अतिशय कमी वेळेत या स्पर्धेच्या तयारी साठी गावातील सर्व नागरिक, प्रतिष्ठित मंडळी, ग्रा प चे सर्व पदाधिकारी व कर्मचारी, गावातील तरुण मंडळी, सामाजिक कार्यकर्ते, गावातील दोन्ही शाळेचे शिक्षकवृंद व विद्यार्थी व अंगणवाडी सेविका, आरोग्य उपकेंद्राचे सर्व कर्मचारी व आशाताई तसेच गावाशी संबंधित सर्व कर्मचारी यांनी चांगल्या प्रकारे सहकार्य केल्यानेच हा बहुमान मिळाला असून सर्वांचे ग्रामपंचायत च्या वतीने खूप खूप आभार!! तसेच या दरम्यान स्पर्धेला कसे सामोरे जावे या साठी पंचायत समिती चे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी व सर्व कर्मचारी यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले तसेच मस्साजोग चे आदर्श सरपंच मा. श्री. धनंजय देशमुख यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्याच बरोबर आपल्या गावचे पाणी पुरवठा विभाग मुंबई येथे कार्यरत असलेले आशिष थोरात यांनी दिलेल्या सूचना आणि केलेले मार्गदर्शन हे या यशस्वी टप्प्यावर कामी आले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

अंबाजोगाई। प्रतिनिधी

मराठवाड्यात मराठी शिक्षण रुजवणाऱ्या मोजक्या संस्थांपैकी योगेश्वरी शिक्षण संस्था ही एक अग्रेसर संस्था असून शिक्षणाचे पुरस्कर्ते स्वामी रामानंद तीर्थ यांनी या संस्थेचे पुनर्जीवन केले या संस्थेचे विद्यार्थी देशात तसेच विदेशात विविध पातळीवर कार्यरत आहे हाच संस्थेचा मोठा नावलौकिक असल्याचे प्रतिपादन पुण्याच्या पशु संवर्धन विभागाचे आयुक्त कौशल कौस्तुभ दिवेगावकर यांनी केले ते योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्ताने आयोजित कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते



यावेळी जेष्ठ स्वातंत्रसेनानी लक्ष्मणराव बोंदर ,नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील प्रा डॉ महेश जोशी मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अभ्यासक भाऊसाहेब उमाटे योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ सुरेश खुरसाळे ,अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर , उपाध्यक्ष गणपत व्यास ,कार्यकारी उपाध्यक्ष एड जगदीश चौसाळकर ,सचिव कमलाकर चौसाळकर , सहसचिव प्रा भीमाशंकर शेटे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने हुतात्मा स्मृती दालन,शोयब उल्लाखान स्मृती कक्ष, स्वामीजी निवास या दालनाचे उद्घाटन मान्यवर पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले यावेळी पाहुण्यांनी संस्थेच्या कार्याचा गौरव केला योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने परिसरातील हुतात्मा स्मृतीस्तंभास मान्यवरांच्या उपस्थितीत मानवंदना देण्यात आली. प्रारंभीच्या प्रास्ताविकातून डॉ.सुरेश खुरसाळे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम व हैदराबाद मुक्तिसंग्राम स्मृती कक्षाच्या उभारणीबाबत आणि संस्थेच्या इतर सामाजिक कार्याचा आढावा घेतला पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य आर व्ही कुलकर्णी यांनी करून दिला संचालन व उपस्थितांचे आभार प्रा. व्ही.जी.कळलावे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.डॉ. गणेश पिंगळे,प्राचार्य रमण देशपांडे,प्रा.एस.पी. कुलकर्णी,कलाशिक्षक गणेश कदम, किरण राऊतमारे यांच्यासह इतरांनी परिश्रम घेतले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी संचालक विविध विभागातील कर्मचारी शहरातील नागरिक उपस्थित होते .

# पाटलांच्या समर्थनार्थ जिल्हा बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

## माजलगाव, परळी, धारूर,वडवणी, शिरूर, लिंबागणेश, सिरसाळा,पोहनेर बंद

## जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ लिंबागणेश कडकडीत बंद

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण संघर्ष योध्दा मनोजजी जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण मिळावे यासाठी अंतरवली सराटी येथे सहाव्यांदा आमरण उपोषण सुरू केले असुन आज उपोषणाच ५ वा दिवस असुन त्यांची प्रकृती खालावली आहे.सरकारकडुन वारंवार मराठा आरक्षण बाबतीत शब्द देऊनही चालढकल करण्यात येत असुन मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ दिलेल्या शब्दाला जागत नाहीत.त्यामुळे सगेसोयरे अधिसुचनेची अंमलबजावणी करा, हैदराबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट लागु करा, अंतरवली सराटीसह राज्यात मराठा आंदोलनाच्या निमित्ताने




दाखल गुन्हे मागे घेण्यात यावेत.मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरीत सामावून घ्यावे.मराठा आणि कुणबी एकच असुन अध्यादेश पारित करून कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे या मागण्यांसाठी उपोषण सुरू केले असुन त्यांच्या समर्थनार्थ बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली असुन लिंबागणेश येथील सर्व बांधवांनी दुकाने बंद ठेवून उत्स्फूर्तपणे बंद मध्ये सहभाग घेतला. शिवतीर्थ याठिकाणी एकत्र जमा होत जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ '' लढेंगे जितेंगे हम सब जरांगे '',''एक मराठा लाख मराठा'' जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है'' म्हणत जरांगे पाटील यांची प्रतिमा घेऊन घोषणाबाजी केली. यावेळी लिंबागणेश पोलिस चौकीचे अंमलदार संतोष राऊत आणि बाबासाहेब डोंगरे यांच्या मार्फत पोलिस अधीक्षक बीड यांना लेखी निवेदन देण्यात आले. कायदा व सुव्यवस्था सांभाळून शांतता राखत बंद पाळण्यात आला. यावेळी डॉ.गणेश ढवळे, बालासाहेब जाधव,कल्याण वाणी, विक्रांत वाणी, अक्षय वाणी,सुरेश ढवळे,अशोकराजे वाणी,अँड.गणेश वाणी, भगवान मोरे,बाळकृष्ण मुळे,अक्षय येडे, संजय सुकाळे,दामु थोरात, विनायक वाणी, संतोष भोसले,भरत वाणी, अमोल जाधव,आण्णा जाधव आदी सहभागी होते.



## संघर्ष योध्दा जरांगे पाटलांचा समर्थनार्थ माजलगाव बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माजलगाव । प्रतिनिधी**

सरकारने मराठ्यांना सरसकट ओबीस तुन कुणबी आरक्षण,सग्यासोयऱ्याचा कायदा लागू करुन हैदराबाद संस्थान,सातारा संस्थान,बॉम्बे संस्थानचे गॅजेट्स लागु करण्याच्या व इतर मागण्यांसाठी मराठ्यांचा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवली सराटी येथे दि १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनापासून बेमुदत आमरण उपोषण सुरू केले असुन दि २१ सप्टेंबर शनिवार रोजी उपोषणाचा पाचवा दिवस असुन संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटलांची प्रकृती खालावली असल्याने शासनाने मनोज जरांगे पाटलांच्या मागण्यांसंदर्भात लवकर करवाई करण्यासाठी व मनोज जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ दि २१ सप्टेंबर शनिवार रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती.याचाच एक भाग म्हणून माजलगाव मध्ये सकल मराठा समाजाच्या वतीने माजलगाव बंद करण्यासाठी दि २१ सप्टेंबर शनिवार रोजी सकाळी १०:०० वाजता माजलगाव शहरात सकल मराठा समाजाच्या वतीने रॅली काढत व्यापारी बांधवांना बंदचे आवाहन करण्यात आले.व्यापारी बांधवांनी सकल मराठा समाजाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत माजलगाव शहर कडकडीत बंद ठेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## सिरसाळा,पोहनेर बंद



**परळी । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी सहाव्यांदा अमरण उपोषण अंतरवेलीत करत आहेत. त्यांची तब्येत खालावली असल्याने मराठा समाजात सरकार विरुद्ध तिव्र संताप निर्माण झाला आहे.या मुळे पाटील यांच्या अंदोलन समर्थनार्थ बीड जिल्हा बंद ची हाक देण्यात आली आहे. याचाच एक भाग म्हणून परळी तालुक्यातील सिरसाळा ,पोहनेर ह्या गावात बंद पाळण्यात आला,मराठा अंदोलकांनी गावभर रॅली काढत बंद चे आवाहन केले. व्यापारी मंडळींनी देखील प्रतिसाद देत दुकाने बंद ठेवली . केवळ अत्यावश्यक सेवा मधील मेडीकल , दवाखाने सुरु होते. सदरील अंदोलना बाबत चे निवेदन अंदोलकांनी सिरसाळा येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे यांना दिले तर पोहनेर येथे अंदोलकांचे निवेदन पोलीस कॉनस्टेबल सोनवणे यांनी स्विकारले .

## संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा ; परळी बंदला प्रतिसाद

**परळी । प्रतिनिधी**

मागच्या १६ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री १२.०८८ वाजल्यापासून मराठा आरक्षणासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे आंतरवली सराटी जिल्हा जालना येथे आमरण उपोषणाला बसले आहेत त्या उपोषणाची दखल घेतली नसल्यामुळे बीड बंद आव्हान करण्यात आले होते म्हणून आज शनिवार २१ सप्टेंबर २०२४ रोजी परळी बंद करण्यात आली होती



या बंदला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. मराठा आरक्षणाचा प्रश्न मागच्या अनेक वर्षापासून सरकारने रेंगाळत ठेवला आहे मागच्या एक ते दीड वर्षापासून मनोज जरांगे पाटील हे सातत्याने आमरण उपोषण करत आहेत इतर आंदोलनामार्फत आरक्षणासाठी रस्त्यावर उतरले आहेत पण अजूनही सरकारनं मराठा आरक्षणाची मागणी मान्य केली नाही. मागच्या काही महिन्यापूर्वी नवी मुंबई येथे मुख्यमंत्री यांनी सगेसोयऱ्याचा अध्यादेश लागू करून सरसगट समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करणारा असे लेखी आश्वासन दिल होत पण त्या आश्वासनाची पूर्तता सरकारने केलेली नाही या आश्वासनाच्या पूर्ततेसाठी मनोज जरांगे पाटील हे आंतरवली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत त्या उपोषणाला पाठिंबा म्हणून बीड जिल्हा बंदछाक देण्यात आली होती त्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सरकारने लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण तात्काळ सोडवावे अन्यथा यापेक्षाही उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा याप्रसंगी सकल मराठा समाज परळीच्या वतीने दिला आहे याप्रसंगी तहसीलदार मार्फत मा मुख्यमंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे शेकडोच्या संख्येने आज परळी येथे मराठा समाज रस्त्यावर उतरला होता.

## मराठा आरक्षणासाठी धारूर बंद तहसिलदारांना निवेदन



**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

मराठा समाजाला कुणबीचे ओ बी सी प्रमाणपत्र तात्काळ द्यावे व मनोज जंरागे यांचे उपोषण तात्काळ सोडवावे या साठी धारूर शहर सकल मराठा समाजाचे वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला. तहसील प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

सकल मराठा समाजाचे वतीने मराठा समाजाला कुणबी चे ओ बी सी प्रमाणपत्र तात्काळ द्यावे मनोज जरांगे यांचे या मागणी पुर्ण करून तात्काळ त्यांचे उपोषण सोडवावे या मागणी साठी २१ सप्टेबंर रोजी धारूर बंदचे आवाहण करण्यात आले होते सकल मराठा समाजाचे युवक कार्यकर्त्यांनी शहरात फिरून बंदचे आवाहण करण्यात आले. शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला तहसील कार्यालयास नायबतहसीलदार नजीर कुरेशी यांना निवेदन देण्यात आले. शहरात सर्व व्यवहार कडकडीत दिवसभर बंद होते. सर्वत्र शुकशुकाट होता. सकल मराठा समाजाचे युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत होते घोषणा देत शहरातून बंद चे अवाहण करत मुख्य बाजारपेठेत फेरी मारली. दिवसभर बाजारपेठ कडकडीत बंद पाळण्यात आला.

## गुजरवाडी येथे विज कोसळून शेतकऱ्यांची बैलजोडी ठार

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील गुजरवाडी येथील शेतकरी राजेभाऊ परशुराम नावडकर हे दि २१ सप्टेंबर शनिवार रोजी आपली बैलजोडी शेतात बांधावर चारत असताना, मुसळधार पावसाला सुरुवात झाली होती.पावसाने विजेच्या कडकडाटा सह जोरदार पावसानी हजेरी लावल्याने.त्यात शेतकऱ्यांच्या बैल जोडीवर वीज कोसळून बैल जोडी दगावलीचे घटना घडली आहे.शेतकऱ्यावर अचानक दुःखाचा डोंगर कोसळला आहे पडणाऱ्या पावसाच्या थेंबा बरोबर दुःखाचे अश्रूचे थेंब देखील शेतकऱ्यांच्या डोळ्यातून थांबत नव्हते.लेकरा सारखं सांभाळलेले पशुधन अचानक निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी पती पत्नी हतबल झाले आहेत.या घटनेची माहिती माजलगाव




येथील तहसिलदार संतोष रुईकर यांना मिळताच शेतकऱ्यांचे सांत्वन केले हि घटना तालुक्यातील गुजरवाडी शिवार, गट नंबर २७४ याठिकाणी दि २१ सप्टेंबर शनिवार रोजी घडली आहे.

## उजणीपाटी येथे विज पडून दोन बैल ठार

**अंबाजोगाई / घाटनांदूर । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील उजनीपाटी येथे शनिवारी दुपारी विज पडून दोन बैल ठार झाले.



शनिवारी दुपारी अंबाजोगाई तालुक्यात विजेच्या कडकडाटा सह जोरदार पाऊस पडला. दुपारी तीन वाजता उजनीपाटी येथील शेतकरी ज्ञानोबा माणिक मुरकुटे यांच्या शेतातील आखाड्यावर विज पडली. या दुर्घटनेत बाहेर बांधलेले दोन बैल जागीच ठार झाले.या दुर्घटनेत या शेतकऱ्याचे १ लाख २० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

## मनिषा तोकले यांची राज्याध्यक्ष म्हणून निवड

बीड । प्रतिनिधी

शेतकरी म्हणून आज पर्यंत केवळ पुरुष शेतकरीच गृहीत धरला जात होता. शेतीमधील महिलांचे किम आणि ज्ञान असुनही महीलांना शेतकरी म्हणून ओळख मिळत नाही. शेतकरी शेतमजूर, ऊसतोड कामगार, अशा असंघटित क्षेत्रातील महीला शासकीय धोरणाचा भाग बनत नाहीत. त्या कायम वंचित राहतात.



महीला शेतकर्यांना शेतकरी म्हणून ओळख नसणे, जमिनीवरचा हक्क मिळविताना अडचणी येणे., कामाच्या ठिकाणी सुविधा न भेटणे, असे अनेक प्रश्न महीला शेतकर्यांचे आहेत. त्या प्रश्नाकडे सोयीस्कर पणे दुर्लक्ष केले जात आहे. अशा प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी तसेच नविन पर्याय शोधण्यासाठी शेतकरी, उसतोड व इतर असंघटित महीला कामगार मंचाची ५ सप्टेंबर रोजी स्थापना करण्यात आली. या साठी महीला किसान अधिकार मंच( मकाम) ने पुढाकार घेऊन राज्य व्यापी बैठक एस एम जोशी फौडेशन, पुणे येथे आयोजित केली होती. या वेळी मंचाची राज्य कार्यकारीणीची सर्व सहमतीने निवड करण्यात करण्यात आली.

यावेळी मकामच्या सदस्य सिमा कुलकर्णी, जेष्ठ समाजवादी नेते सुभाष वारे, मोलकरीण संघटनेच्या मेधा थत्ते, संघर्ष वाहिनीचे दीनानाथ वाघमारे, कागद काच पत्रा कष्टकरी संघटनेच्या सुरेखा गाडे, व शुभदा देशमुख, शेतकरी नेत्या कुमारी बाई जम कातन, सरिता मेश्राम, माधुरी खडसे, जोती थोरात रीना राऊत उपस्थित होत्या.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण, आणि पश्चिम महाराष्ट्र अशा विविध विभागातून जवळपास १०० शेतकरी महीला उसतोड, मासेमारी व जंगलात काम करणाऱ्या महीला प्रतिनिधींनी बैठकीत आपले प्रश्न मांडले.

◀◀ पान ३ वर

## परळी उपविभागीय कार्यालयावर बैलगाडी व ट्रॅक्टर मोर्चा

### शेतकरी, शेत मंजुर यासह नागरीकांनी हजारोच्या संख्येने सहभागी व्हा-राजेभाऊ फड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा २०१८- २०१९ या वर्षातील पिक विमा अद्याप मिळाला नाही तसेच सोयाबीनला हमीभाव नाही यासह शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नावर शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने परळी उपविभागीय कार्यालयावर बुधवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० वाजता भव्य बैलगाडी



व ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात शेतकरी, शेत मंजूर यासह नागरीकांनी हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रासपा चे मा.प्रदेशाध्यक्ष राजेभाऊ फड यांनी केले आहे.

बीड जिल्ह्याला २०१८ पासून चा पिक विमा मिळालेला नाही. बीड जिल्ह्याच्या शेजारी असणारे परभणी, धाराशिव, लातूर आदी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा मिळालेला आहे. परंतु महाराष्ट्राचे कृषिमंत्री असलेल्या नामदार धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्ह्यातील शेतकर्यांचा सन २०१८- २०१९- २० चा पिक विमा तसेच सोयाबीन खरीप पिक विमा, गुलाबी बोंड आळी नुकसान भरपाई आदीपासून वंचित आहे. तसेच कृषी मंत्री नामदार धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांचे अनुदान द्यावे मगच मत मागायला यावे.

◀◀ पान ३ वर

## रमेश आडसकर यांनी घेतली मनुरवाडी-मजरंथ रस्त्यांसाठी उपोषणार्थींची भेट

**माजलगाव । प्रतिनिधी**

शिव संग्रामचे तालुका अध्यक्ष उतमराव पवार यांच्या नेतृत्वा खाली मनुरवाडी येथे माजलगांव ते मंजरथ रस्ताचे काम अंदाज पत्रकातील तरतुदीनुसार करण्यात यावे यामागणीसाठी आमरण उपोषण बसलेल्या ग्रामस्थांची भाजपा नेते रमेशराव आडसकर यांनी भेट घेत संबंधित अधिकारी यांना सुचना केल्या. यावेळी बबनराव बप्पा सोळंके, सरपंच,संजय बडवने, अल्पसंख्याक आघाडीचे तालुका अध्यक्ष. खयुम भाई पठान,अनंत जगताप,अर्जुन पायघन,छबन घाडगे यांच्यासह सहकारी उपस्थित होते.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याकरीता प्रयत्न करणार -नितीन गडकरी

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील नवीन विमानतळाचे काम चांगले झाले असून या नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्यावतीने महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, कमिन्स महाविद्यालय, कर्वेनगर येथे आयोजित जिल्ह्यातील विविध प्रकल्पांच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, प्राधिकरणाचे मुख्य प्रबंधक अंशुमाली श्रीवास्तव, प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते. गडकरी म्हणाले, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. आपला इतिहास, संस्कृती आणि वारसा यादृष्टीने महाराष्ट्राचे एक वेगळेपण असून संत महापुरुषांच्या ग्रंथानी, ओव्यांनी आपले जीवन समृद्ध आणि संपन्न केले आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग हे भक्तीमार्ग असून या मार्गाने लाखो वारकरी पायी जातात. वारकऱ्यांच्या सुविधेच्या



अनुषंगाने दोन्ही पालखी मार्गाकरीता सुमारे १२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या मार्गावर संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, श्री विठ्ठल यांच्या प्रतिकृती, विजेची व्यवस्था, वृक्षाची पुर्नलागवड तसेच सुमारे ४२ हजार नवीन झाडे लावण्यात आली आहेत. आगामी काळात स्वयंसेवी संस्था आणि वारकऱ्यांनी या मार्गावर वृक्षारोपण करुन येत्या काळात हरित महामार्ग करण्याकरीता सहकार्य करावे. एनएचएआय मार्फत नाशिक फाटा ते खेड, हडपसर ते यवत, कात्रज बोगदा ते रावेत, तळेगाव–चाकण–शिक्रापूर, पुणे ते शिरुर, पुणे ते छत्रपती संभाजीनगर अशी विविध विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. येत्या डिसेंबरपर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यात १ लाख ५० हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात येतील. याशिवाय पुणे ते सातारा महामार्गाचा नवीन विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करुन कामे करण्यात येतील. मुंबई– बेंगळुरू या द्रुतगती महामार्गाचे काम हाती घेण्यात आले असून पुण्याच्या वर्तुळाकार मार्गाला याचा लाभ होणार आहे, यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात वारीचे महत्व मोठे आहे. देहू, आळंदी आणि पंढरपूर या तीर्थक्षेत्राकडे संपूर्ण राज्याचे लक्ष असते. श्री विठ्ठलाच्या दर्शनाकरीता वर्षांनुवर्षे, शतकानुशतके अडचणीचा सामना करुन वारकरी श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आशेने पंढरपूरकडे मार्गक्रमण करीत असतात. वारीत पोहचू न शकणारे भाविक आपआपल्या देशातून दर्शनाचा लाभ घेतात, त्यामुळे आपली वारी आता वैश्विक झाली आहे. वारकऱ्यांना योग्य प्रकारच्या सुविधा मिळाल्या पाहिजे, रस्ते रुंद झाले पाहिजे, पालखी मार्ग वेगळा करुन त्या मार्गावर सर्व प्रकारच्या सोई असल्या पाहिजे यादृष्टीने काम होत आहे. वारकऱ्यांना पालखी तळावरही विविध सोई–सुविधा देण्याकरीता त्याठिकाणी भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली असून त्यानंतर केंद्र सरकारच्या मदतीने कामे करण्यात येईल. येत्या काळात वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सोई–सुविधा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. नवीन विमानतळाला जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे नामकरण करण्याबाबत येत्या मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव मांडण्यात येईल, आणि केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल. केंद्रीय राज्यमंत्री श्री. मोहोळ म्हणाले, केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांच्या संकल्पनेतून श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम पालखी मार्गांचे बांधकाम होत आहे. रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या माध्यमातून गेल्या १० वर्षांच्या काळात महाराष्ट्रात सर्वाधिक महामार्ग निर्माण झाले आहेत, असेही श्री. मोहोळ म्हणाले.यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष ड. राजेंद्र उमाप, श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मोरे, श्री विठ्ठल–रूक्मिणी मंदिर पंढरपूर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.

## अल्पवयीन आरोपीला प्रौढच समजावे बाल न्याय मंडळाकडे मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**राजगड पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये झालेल्या दोन वर्षीय बालिकेवर बाललैंगिक अत्याचार प्रकरणी पोलिसांनी वेळेवर गुन्हा दाखल केला आहे. १७ वर्षीय अल्पवयीन आरोपीला प्रौढ समजूनच वागणूक द्यावी यासाठी आम्ही बाल न्याय मंडळाकडे मागणी केली आहे. त्यानुसार कारवाई करणार असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी बोलताना दिली.**

जिल्ह्यात बाललैंगिक अत्याचार प्रकार वाढू लागल्याच्या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम दै.'पुढारी'मधून 'बदलापूरची लाट रोखण्यासाठी सरकारने पावले उचलावीत' या मथळ्याखाली वृत्त प्रसारित केले होते. आंदोलने, सर्वस्तरातून संतापाची लाट उसळली असल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे ग्रामीणचे जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी शुक्रवारी (दि. २०) सायंकाळी राजगड पोलिस ठाणे कामथडी (ता. भोर) येथे भेट देऊन घटनेचा सविस्तर आढावा घेऊन पुढील तपासाबाबत राजगड पोलिसांना सूचना दिल्या. पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी सांगितले की, राजगड पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये बाललैंगिक अत्याचार झालेल्या घटनेपासून ते गुन्हा दाखल होईपर्यंत कागदोपत्री पडताळणीमध्ये अल्पवयीन आरोपीला तातडीने त्याच दिवशी ताब्यात घेतले होते. उपविभागीय पोलिस अधिकारी, प्रभारी पोलिस निरीक्षक यांनी समक्ष हजर राहून वेळेवर गुन्हा दाखल केले असल्याचे दिसून येत आहे. आरोपीला तातडीने बाल न्यायालयात हजर करून त्याची रवानगीदेखील बाल सुधारगृहात झाली आहे. या वेळी उपविभागीय पोलिस अधिकारी तानाजी बर्डे, पोलिस निरीक्षक राजेश गवळी, उपनिरीक्षक अजित पाटील, तपासी अधिकारी वृषाली देसाई, सहायक उपनिरीक्षक राजेंद्र चव्हाण, पोलिस अंमलदार सचिन नरुटे, मंगेश कुंभार उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर महाविद्यालयाला नॅकची 'बी प्लस' श्रेणी

पुणे । प्रतिनिधी

पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या येरवडा येथील डॉ.आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेने (नॅक) शैक्षणिक मूल्यांकनात 'बी प्लस' श्रेणी प्रदान केली आहे. यामुळे महाविद्यालयाच्या नावलौकीकात आणखीच विशेष महत्वाची भर पडली आहे.




नॅक मूल्यांकन समितीने ९ व १० सप्टेंबरला महाविद्यालयाला भेट देवुन पाहणी व तपासणी केली होती. त्यात शैक्षणिक प्रक्रियेत संस्थेची कामगिरी, अभ्यासक्रमाची निवड आणि अंमलबजावणी, शैक्षणिक दर्जा आणि मूल्यमापन, विद्यार्थ्यांचे निकाल, संशोधन कार्य आणि प्रकाशन, मूलभूत सुविधा आणि संसाधनांची स्थिती, संस्था, प्रशासन, आर्थिक स्थिती आणि विद्यार्थी सेवा आदींचा समावेश होता. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.गौतम बनसोडे, आयक्युएसी समन्वयक प्रा.डॉ.रुपेश थोपटे यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या भरीव योगदान व कामगिरीमुळे महाविद्यालयाला नॅक मुल्यांकनाच्या तिसऱ्या फेरीमध्ये (थर्ड सायकल) 'बी प्लस' श्रेणी प्राप्त झाली आहे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, सचिव संजीव बोधनकर, उपाध्यक्ष डॉ. डी.जी.देशकर, माजी प्राचार्य डॉ. सोमनाथ नजन, डॉ. नितीन बिरमल, डॉ. मनोज पांडकर यांच्या मार्गदर्शन व सहकार्याचा लाभ महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी सतत होतो.

## वाहतूक कोंडीला वाघोलीकरांचा बेशिस्तपणा कारणीभूत; वाहतूक पोलिसांची गांधीगिरी

वाघोली - महिनाभरात लोणीकंद वाहतूक विभागाच्या हजारो कारवाया, लाखोंचा दंड वसूल, वाहतूक नियमन बाबत जनजागृती, गांधी गिरी. मात्र तरीही वाघोलीकर वाहतूक नियमांची ऐशी तैशीच करीत आहेत. उलटी वाहतूक करणे, ट्रीपल शीट वाहतूक, कुठेही पार्किंग करणे सुरूच आहे. आपल्या बेशिस्त वाहतुकीमुळे वाघोलीत वाहतूक कोंडी होते. याची जाणीव आहे तरीही हे सुज्ञ व शिक्षित वाहनचालक नियम तोडतच आहे.




पुणे नगर रोड व वाघोली म्हणजे वाहतूक कोंडी हे समीकरण झाले आहे. पुणेकर तर आहेतच मात्र मराठवाडा, विदर्भ व त्या बाजूने येणारे नागरिक वाघोलीच्या वाहतूक कोंडीने त्रस्त आहेत. वाघोली आली की त्यांना धास्ती बसते. वाघोली साठी स्वतंत्र लोणी कंद वाहतूक विभाग सुरू करण्यात आला. पुणे नगर रोड वरून जाणाऱ्या दररोजच्या वाहनांची संख्या सुमारे दीड लाख आहे. वाहनांची संख्या व कमी पडत असलेला महामार्ग ही स्थिती आली तरी वाहतूक नियम पाळून कोंडी कमी करणे शक्य आहे. मात्र सोशल मीडियावर सतत तक्रार करणारे, वाहतूक पोलिसांना ट्रोल करणारे हेच नागरिक, वाहतूक कोंडीवर चर्चा घडविणारे हेच नागरिक उलटी वाहतूक करताना प्रचंड संख्येने दिसून येतात. चौकात जावून वळण्याचे कष्ट ते घेत नाहीत. विशेष बाब म्हणजे हेच वाघोलीकर जेव्हा चंदननगर व पुढे जातात तेव्हा वाहतुकीचे नियम बरोबर पाळतात.

वाघोलीतील कोंडी दूर करण्यासाठी उड्डाणपूल, बायपास रस्ते यांची गरज असली तरी सध्याच्या परिस्थितीत कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक नियम पाळणे तेवढेच गरजेचे आहे. महिनाभरात आम्ही लाखोंचा दंड भरू मात्र नियमांची ऐशी तैशी करू अशीच मानसिकता या सुज्ञ व शिक्षित वाहनचालकांची दिसून येते. केवळ वाहतूक पोलिसांना दोष देवून कोंडी सुटणार नाही तर वाहतूक नियमांचे पालन करून व पोलिसांना साथ देवून कोंडी कमी करणे शक्य होणार आहे. नागरिकांनी वाहतूक नियम पाळावे यासाठी लोणीकंद वाहतूक विभाग वाहतूक नियमन जनजागृती, नियम मोडणाऱ्या ना फुल देवून गांधीगिरी करीत आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात तरुण जखमी



**आंबेगाव । प्रतिनिधी**

**कळंब (ता. आंबेगाव) येथे मामाकडे येत असलेल्या तरुणावर बिबट्याने हल्ला केला. ही घटना गुरुवारी (दि. १९) रात्री साडेआठच्या सुमारास कळंब–लौकी रस्त्यावर घडली. गणेश विलास ढवळे (वय २४ रा. पिंपळवंडी, ता. जुन्नर) असे हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. गणेश ढवळे हा तरुण गुरुवारी रात्री ८ च्या दरम्यान दुचाकीवर कळंब येथे सीताराम किसन थोरात या त्याच्या मामाकडे दुचाकीवरून येत होता.**

कळंब हद्दीत कळंब–लौकी रस्त्यालगत उसाच्या शेतात लपून बसलेल्या बिबट्याने अचानक त्याच्यावर झेप घेतली. त्या वेळी गणेश याने दुचाकी पळवली. बिबट्याने त्याचा जवळपास अर्धा किलोमीटरपर्यंत पाठलाग केला. गणेश याने घरी येऊन मामाला घडलेली घटना सांगितली. त्या वेळी त्याच्या पायाला, पाठीला बिबट्याचा पंजा लागल्याने जखम झाली होती. मामा व त्याच्या कुटुंबीयांनी त्याला तत्काळ मंचर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

### रस्त्यावर पथदिव्यांची व्यवस्था करण्याची मागणी

**कळंब–लोकी या रस्त्यावर गेल्या वर्षभरात बिबट हल्ल्याच्या नऊ ते दहा घटना घडल्या असून, या ठिकाणी वारंवार पिंजरा लावूनही बिबट्या जेरबंद होत नसल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. ज्या ठिकाणी बिबट्याचा हल्ला होतो. त्या ठिकाणी रस्त्याच्या बाजूला पथदिव्यांची व्यवस्था करावी तसेच रस्त्यालगतची झाडे–झुडपे काढून टाकावी, अशी मागणी स्थानिक शेतकरी विनोद थोरात यांनी केली आहे.**

## पिंपरी विधानसभा निवडणुकीत भाजप'चाच उमेदवार हवा; पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत एकमत

**पिंपरी । प्रतिनिधी**

अनुसूचित जातीकरिता राखीव असलेला पिंपरी विधानसभा मतदार संघ हा भाजपला मिळावा. तसेच या मतदार संघातून भाजप कार्यकर्त्यालाच उमेदवारी मिळावी, याकरिता शहर पातळीवरील भाजप पदाधिकारी कमालीचे आक्रमक झाले आहेत. शनिवारी (दि.२०) पार पडलेल्या पदाधिकार्यांच्या बैठकीत पिंपरी विधानसभा भाजपला सोडण्यावर या पदाधिकार्यांचे एकमत झाले असून, ही भावना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळविणार असल्याची माहिती या पदाधिकार्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. पिंपरीत पार पडलेल्या या बैठकीला आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगरसेवक शितल शिंदे, राजू दुर्गे व पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार उमा खापरे म्हणाल्या की, पिंपरी विधानसभा जागा भाजपची आहे. गेल्या निवडणुकीत अमर साबळे यांना उमेदवारी देण्यात आली होती.त्यामध्ये त्यामचा निसटता पराभव झाला. त्यानंतर भाजप समर्पित आरपी आय उमेदवार चंद्रकांता सोनकांबळे यांनी भाजपच्या पाठिंब्यावर लढविलेल्या या निवडणुकीत त्यांचा किरकोळ मतांनी पराभव झाला. पिंपरी विधानसभा मतदारसंघात भाजपचे एकूण १४ नगरसेवक आहेत. लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराला या मतदार संघातून १७ हजार मतांची आघाडी दिली आहे. भाजपचे शक्तीप्रमुख, बूथप्रमुख यांच्या संघटन कौशल्यामुळे भाजप हे करू शकला आहे. त्यामुळे ही जागा भाजपला मिळावी, अशी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आग्रही मागणि आहे. ही भावना आम्ही प्रदेशाध्यक्ष चंद्रशेकर बावनकूले व उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोचविणार आहोत.

पुढे खापरे म्हणाल्या की, या मतदार संघातून भाजपच्याच कार्यकर्त्याला उमेदवारी मिळावी,अ शी आमची आग्रही भुमिका असणार आहे. इतर राजकीय पक्षाने कोणाला उमेदवारी द्यावी, कोण याच्याशी अमचे काही देण–घेणं नाही. आमचे फक्त एकच म्हणने असून याठिकाणी आम्हाला कमळ चिन्ह हवे आहे.

आमदार अमित गोरखे म्हणाले की, आजच्या बैठकीत आमचा चर्चेचा विषय वेगळा होता. मात्र कार्यकर्त्यांची असलेली भावना पक्षश्रेष्ठींपर्यंत पोचविणे गरजचे असल्याने ती पोचविण्यासाठी तसेच हा मतदार संघ भाजपला कसा सुटेल, यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्न करणार आहोत. सदाशिव खाडे म्हणाले की, या मतदार संघात कार्यकर्त्यांना कमळाचे निवडणूक चिन्ह हवे आहे. आमचा कोणत्याही व्यक्तीला विरोध नसून, भाजपचा आमदार कास निवडून येईल, हे आमच्यासाठी महत्वाचे आहे. भाजप आणि कमळ हाच आमचा अट्टाहास आहे. राजू दुर्गे म्हणाले की, या मतदार संघात महायुतीच्या उमेदवारांमध्ये मैत्रीपूर्ण लढत झाली तरी चालेल. त्यांनी त्यांचे लढावे, आम्ही आमचे लढणार आहोत.

## रायसोनी करंडक एकांकिका स्पर्धा २९ सप्टेंबरपासून

पुणे । प्रतिनिधी

जी. एच. रायसोनी स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशनतर्फे आयोजित जीएच रायसोनी करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी पुण्यात २९ सप्टेंबर ते १० ऑक्टोबरदरम्यान होणार आहे. वाघोलीतील जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयात सकाळी १०.३० वाजता स्पर्धेची प्राथमिक फेरी सुरू होईल, अशी माहिती महाविद्यालयाचे कॅम्पस संचालक डॉ. आर. डी. खराडकर आणि नाट्यमंडळ प्रमुख डॉ. प्रगती कोरडे यांनी दिली. ही स्पर्धा मराठी भाषेतील एकांकिकांसाठी आहे. स्पर्धेची अंतिम फेरी १ ते ४ फेब्रुवारी या कालावधीत नागपूरला होणार आहे. स्पर्धेसाठी नोंदणी करण्याची मुदत २४ सप्टेंबरपर्यंत आहे.


## जबरी चोरीचा बनाव करून खून, १० तासांत आरोपी ताब्यात

बीड । प्रतिनिधी

जबरी चोरी चा बनाव करत एका नागरिकाचा खून करण्यात आला होता. याप्रकरणी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने १० तासाच्या आत आरोपींना अटक करण्यात आली आहे. ही घटना शनिवारी (दि.२१) पहाटे वारजे पोलीस ठाणे हद्दीत घडली होती. अमोल निवंगुणे असे मयत नागरिकाचे नाव असून पोलिसांनी प्रसन्न साहेबराव कोकरे (वय २७ वर्ष, रा. आनंद विहार, सिंहगड रोड) याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी व मयताची पत्नी यांची मैत्री होती. या संशयातून मयताने आरोपीला मारहाण केली होती. याच रागातून आरोपीने मयताचा खून केला. यावेळी आरोपीने जबरी चोरीचा बनाव केला होता.खुनाची माहिती मिळताच तपासी पथके हे आरोपीच्या मागावर होते. दरम्यान गुन्हे शाखेला संशयित आरोपी प्रसन्न कोकरे याचे नाव निष्पन्न झाले.

आरोपी हा त्याच्या आनंद विहार, सिंहगड रोड येथील राहत्या घराजवळ आला आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी




आरोपीला पाठलाग करून पकडले. अधिक तपास केला असता त्याने गुन्हा केला असल्याचे कबूल केले. मयताची पत्नी हिचेशी त्याची मैत्रीपूर्ण ओळख होती आणि त्यावरून मयताने आरोपी प्रसन्न कोकरे यास यापूर्वी मारहाण केली होती. मयत इसम हा पत्नी बरोबर आरोपीच्या नावाने संशय घेत होता. सदर आरोपीने आरोपीस झालेली मारहाण व मैत्रीपूर्ण संबंधात अडथळा ठरणाऱ्या पतीचा खून केला आहे. आरोपीला वारजे पोलीस स्टेशन येथे पुढील कारवाईसाठी ताब्यात दिले आहे. मयताची पत्नी व इतर कोणी गुन्ह्यामध्ये सहभागी आहे का याबाबत चौकशी चालू आहे. तिचा या गुन्ह्यात कशापद्धतीने सहभाग आहे याची खातरजमा करत आहेत. ही कारवाई दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक एक १, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नंदकुमार बिडवई व खंडणी विरोधी पथक १ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश संखे यांनी स्वतः व पोलीस अंमलदार सयाजी चव्हाण, गणेश ढगे, दुर्योधन गुरव, राजेंद्र लांडगे,प्रफुल्ल चव्हाण, महेश पाटील, साई कुमार कारके अंकुश भिसे यांनी केली आहे. तपासात शेंडगे,व.पो.नि वारजे पोलीस स्टेशन. व वारजे पोलीस स्टेशन कडील डी.बी चे अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे .

## आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी डॉ. देशमुख यांना निमंत्रण

**पुणे । प्रतिनिधी**

रशियातील पीटर्सबर्ग येथे 'नेपल्कोव्ह कॅन्सर सेंटर'तर्फे 'नर्सिंग इन ऑन्कोलॉजी' या दुसऱ्या वार्षिक शैक्षणिक नर्सिंग परिषदेचे २३ नोव्हेंबरला आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये 'कॅन्सरच्या उपचारात आयुर्वेदिक पद्धतींचा वापर' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी पुण्यातील 'भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्ट'च्या प्राध्यापिका डॉ. वनिता देशमुख यांना निमंत्रित करण्यात आले आहे.



तसेच रशियातील सेंट पीटर्सबर्ग येथे २१ आणि २२ नोव्हेंबरला होणाऱ्या 'ब्रिक्स' परिषदेमध्ये असणाऱ्या विशेष कर्करोग सत्रात देखील डॉ. वनिता देशमुख आणि डॉ. भाग्यश्री सरदेशमुख यांना निमंत्रित केले आहे. 'ब्रिक्स' परिषदेमध्ये पहिल्यांदाच पारंपारिक उपचार पद्धतीला प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. भारतातील आयुर्वेद उपचार पद्धतीचे प्रतिनिधित्व त्यांच्याद्वारे करण्यात येणार आहे.